बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक २४ | बुधवार,दि.२१ मे २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# भारताने ३ दिवसात पकडले ११ पाकिस्तानी हेर

**दिल्ली:–** २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्लयानंतर हेरगिरीच्या कारवायांमध्ये सहभागी असलेल्यांवर देशभरात कारवाई सुरू असताना , तीन दिवसांत, अनेक राज्यांमध्ये पाकिस्तानसाठी हेरगिरी करण्याच्या आरोपाखाली ११ जणांना अटक करण्यात आली आहे . भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेबद्दल आणि लष्कराबद्दलची संवेदनशील माहिती पाकिस्तानी कार्यकर्त्यांना दिल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी रंगेहाथ पकडलेल्या ११ जणांमध्ये एक युट्यूबर, सुरक्षा रक्षक आणि एक अ?ॅप डेव्हलपर यांचा समावेश आहे. सर्वात प्रमुख अटक झालेल्यांमध्ये हरियाणातील ट्रॅव्हल व्लॉगर ज्योती मल्होत्रा ??होती, जिला संवेदनशील माहिती लीक केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या इतर आरोपींमध्ये विद्यार्थी, एक सुरक्षा रक्षक, सामान्य नागरिक आणि एक अ?ॅप डेव्हलपर यांचा समावेश आहे.

सोशल मीडिया, आर्थिक प्रोत्साहने, खोटी आश्वासने, मेसेजिंग अ?ॅप्स आणि पाकिस्तानला वैयक्तिक भेटी देऊन आरोपींना गुप्तचर नेटवर्कमध्ये आकर्षित करण्यात आले. या नेटवर्क्समध्ये २० आणि ३० च्या दशकातील सोशल मीडिया प्रभावशाली आणि तरुणांचा वापर हेरगिरीच्या विकसित स्वरूपावर देखील प्रकाश टाकतो, जिथे गुप्तचर माहिती गोळा करण्यासाठी निरुपद्रवी वाटणाऱ्या माध्यमांचा वापर केला जाऊ शकतो. सर्व ११ अटक तीन राज्यांमध्ये झाली – हरियाणा, पंजाब आणि उत्तर प्रदेश. पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली आतापर्यंत अटक केलेल्या आरोपींची यादी येथे आहे

ज्योती मल्होत्रा ??सोबत, पोलिसांनी गजाला, एक ३२ वर्षीय विधवा महिला आणि पंजाबमधील मालेरकोटला येथील यामीन मोहम्मद यांनाही पैशाच्या बदल्यात पाकिस्तानी एजंट्सना माहिती शेअर केल्याच्या आरोपाखाली अटक केली. आरोपीने पाकिस्तानी उच्चायोगाचे माजी कर्मचारी दानिशसोबत आर्थिक व्यवहार आणि व्हिसा–संबंधित कामांमध्ये सहकार्य केले. त्यांच्या अटकेनंतर, असे उघड झाले की दानिश त्यांना वारंवार भेटत असे. ते पाकिस्तानी व्हिसा मिळिवण्यासाठी त्याच्याकडे संपर्क साधत असत. शिवाय, त्याच्यामार्फत त्यांच्या मोबाईल फोनवर ऑनलाइन पैसे ट्रान्सफर केले जात होते. त्यांचे काम त्यांच्या हेरगिरी नेटवर्कमध्ये पैसे पोहोचवणे होते.

**ज्योती मल्होत्रा**




हिसार येथील युट्यूबर ज्योती मल्होत्रा हिला एक मालमत्ता म्हणून विकसित केले जात होते, असे पोलिसांनी रविवारी सांगितले. ती मर्ट्रॅव्हल विथ जोफ नावाचे युट्यूब चॅनल चालवते आणि अलीकडील भारत–पाकिस्तान संघर्षादरम्यान ती पाकिस्तानी एजंट्सच्या संपर्कात होती, परंतु तिला संरक्षणाशी संबंधित कोणत्याही माहितीचा थेट प्रवेश नव्हता. यूट्यूबवर ३.८५ लाख सबस्क्रायबर्स असलेले हे प्रभावशाली कलाकार पहलगाम दहशतवादी हल्लयापूर्वी २०२३, २०२४ आणि मार्च २०२५ मध्ये तीन वेळा पाकिस्तानला गेले. ती पाकिस्तानी उच्चायोगातील कर्मचारी एहसान–उर–रहीम उर्फ ??दानिशच्या संपर्कात आली, ज्याला अलीकडेच भारताने हद्दपार केले होते. ती सध्या पाच दिवसांच्या पोलिस कोठडीत आहे. ज्योती मल्होत्राच्या पाकिस्तान आणि काश्मीरच्या अल्पावधीत झालेल्या भेटी देखील तपासल्या जात आहेत, विशेषतः त्यांना विशिष्ट ठिकाणे किंवा सामग्री असलेले प्रवास व्हिडिओ अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले होते का हे निश्चित करण्यासाठी.

**देवेंदर सिंग**

पंजाबमधील पटियाला येथील खालसा कॉलेजमधील २५ वर्षीय राज्यशास्त्राचा विद्यार्थी देवेंदर सिंग याला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली हरियाणाच्या कैथल येथे अटक करण्यात आली. पोलिसांनी सांगितले की त्याने आयएसआय एजंट्सना संवेदनशील माहिती शेअर केल्याचे आढळून आले आहे, ज्यामध्ये पटियाला लष्करी छावणीचे फोटो देखील समाविष्ट आहेत. अटकेच्या वेळी देवेंदर सिंगने फेसबुकवर पिस्तूल आणि बंदुकांचे फोटो अपलोड केल्याचा आरोप आहे. चौकशीदरम्यान, गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये तो पाकिस्तानला गेल्याचे समोर आले.

**अरमान**

नुह येथील २६ वर्षीय अरमान हा आणखी एक संशयित गुप्तहेर होता, ज्याला ज्योती मल्होत्रासोबत भारतीय सैन्य आणि इतर लष्करी कारवायांबद्दलची संवेदनशील माहिती पाकिस्तानसोबत शेअर केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती. पोलिसांनी त्याच्या फोनमधून पाकिस्तानी नंबरवर पाठवलेले संभाषण, फोटो आणि व्हिडिओ जप्त केले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरमान व्हॉट्सअ?ॅपद्वारे भारताच्या लष्करी कारवायांची माहिती पाकिस्तानला पाठवत होता.

**तारीफ**

हेरगिरीच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेला तारिफ हा नूहमधील दुसरा व्यक्ती होता . चौकशीदरम्यान, तारिफने सांगितले की तो पाकिस्तानी दूतावासातील दोन व्यक्तींच्या संपर्कात होता, ज्यांनी त्याला सिम कार्ड दिले होते. तो वारंवार पाकिस्तानला जात असे. अखेर, दूतावासाच्या अधिकाऱ्यांनी त्याला सिरसा येथे जाऊन विमानतळाचे फोटो पाठवण्याची सूचना केली. चौकशी सुरू आहे.

**नौमन इल्लाही**

१५ मे रोजी, हरियाणाच्या पानिपतमध्ये आणखी एका संशयित गुप्तहेराला, २४ वर्षीय तरुणाला आयएसआयशी संबंधित पाकिस्तानस्थित एजंटच्या संपर्कात असल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. उत्तर प्रदेशातील नौमन इलाही हा संशयित एका कारखान्यात सुरक्षा रक्षक म्हणून काम करत होता आणि त्याच्यावर पाकिस्तानला संवेदनशील माहिती पुरवल्याचा आरोप आहे. उत्तर प्रदेशातील कैराना येथील रहिवासी इलाही अनेक वेळा पाकिस्तानला गेला होता. त्याची सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली आहेत.

**मोहम्मद मुर्तजा अली**

आयएसआयसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी पंजाबमधील जालंधर येथे मोहम्मद मुर्तजा अलीला अटक केली. त्याने स्वतः विकसित केलेल्या मोबाईल ॲपद्वारे हेरगिरीचे कारवाया केल्याचे वृत्त आहे. त्याच्याकडून चार मोबाईल फोन आणि तीन सिम कार्ड जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

**शहजाद**

उत्तर प्रदेश दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) आयएसआयसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली शहजाद नावाच्या एका व्यक्तीला अटक केली . रामपूर जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या शहजादला शनिवारी मुरादाबाद येथून ताब्यात घेण्यात आले. तपासात असे दिसून आले की शहजादने अनेक वेळा पाकिस्तानला प्रवास केला होता आणि तो सौंदर्यप्रसाधने, कपडे, मसाले आणि इतर वस्तूंच्या सीमापार बेकायदेशीर व्यापारात गुंतला होता. तस्करी रॅकेट त्याच्या हेरगिरी कारवायांसाठी एक आघाडी म्हणून काम करत होता, असे पोलिसांनी सांगितले. त्याच्यावर अनेक आयएसआय कार्यकर्त्यांशी जवळचे संपर्क स्थापित करण्याचा आणि त्यांना भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील आणि गोपनीय माहिती पुरवण्याचा आरोप आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की आरोपी केवळ गुप्त माहिती देत ??नव्हता तर भारतातील आयएसआयसाठी कारवाया सुलभ करत होता. शहजादला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आणि त्याला मुरादाबादहून लखनऊला नेण्यात आले.

**सुखप्रीत सिंह**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानला संवेदनशील माहिती लीक केल्याच्या आरोपाखाली पंजाब पोलिसांनी गुरुदासपूरमध्ये सुखप्रीत सिंगसह दोघांना अटक केली . पंजाब पोलिस महासंचालक गौरव यादव म्हणाले की, आरोपी ऑपरेशन सिंदूरशी संबंधित गोपनीय माहिती, ज्यामध्ये सैन्याच्या हालचाली आणि पंजाब, हिमाचल प्रदेश आणि जम्मू आणि काश्मीरमधील प्रमुख मोक्याच्या ठिकाणांचा समावेश आहे, आयएसआयला शेअर करण्यात गुंतलेला होता. डीआयजी बॉर्डर रेंज सतींदर सिंग म्हणाले की, पहलगाम दहशतवादी हल्लयानंतर आयएसआयने आरोपींना सक्रिय केले आणि त्यांच्या खात्यात १ लाख रुपये ट्रान्सफर करण्यात आले. आरोपी १९ किंवा २० वर्षांचा असल्याचे सांगितले जात आहे.

**करणबीर सिंग**

त्याच कारवाईत, गुरुदासपूरमध्ये पकडलेल्या दोन संशयितांपैकी एक, करणबीर सिंग, आयएसआय हँडलर्सशी थेट संपर्कात होता आणि त्याने भारतीय सशस्त्र दलांबद्दल महत्त्वाची माहिती प्रसारित केली होती, असे डीजीपी गौरव यादव यांनी सांगितले. डीआयजी बॉर्डर रेंज सतिंदर सिंग म्हणाले की, आरोपी गेल्या १५–२० दिवसांपासून माहिती शेअर करत होते आणि ते ड्रग्ज तस्करीतही सहभागी होते. सुखप्रीत आणि करणबीर यांच्याविरुद्ध कडक अधिकृत गुप्तता कायद्याअंतर्गत एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

## गणित व विज्ञान विषयाचे शिक्षकच नसतांना जि.प.प्राथ.शाळेत आठवीचे वर्ग सुरु करण्याचा अट्टाहास का?

**गोंदिया:–** राष्ट्रीय पातळीवर तयार करण्यात आलेल्या शैक्षणिक धोरणात प्राथमिक शिक्षणाची सुविधा गावातच असायला हवी.या शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर आता राज्याच्या शालेय शिक्षण विभागाकडून संबंधित जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पाचवी व आठवीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.मात्र ते वर्ग सुरु करतांना शासन शिक्षक देणार नाही,हे तेवढेच स्पष्ट आहे.सध्याच्या घडीला सेमी इंग्रजी व इंग्रजीमाध्यामाच्या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांच्या कल असतांना जिल्हा परिषदेच्या शांळामध्ये पाहिजे तसे गणित व विज्ञान विषयाचे शिक्षकच नसतांना जि.प.प्राथ.शाळेत आठवीचे वर्ग सुरु करण्याचा अट्टाहास का?असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार चौथीच्या वर्गाला पाचवीचे वर्ग व सातवीच्या वर्गाला आठवीचे वर्ग जोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात जवळपास ३८ शाळांत पाचवीचे तर ४७ च्या जवळपास आठवीचे वर्ग सुरू करण्यासाठी प्रस्ताव आले आहेत. हे वर्ग सुरू करण्यासाठी शाळांनी पंचायत समितीला प्रस्ताव पाठविण्याबाबतच्या सूचना गटशिक्षणाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.



गोंदिया जिल्हा परिषदेने २०१५–१६पासून जिल्हा परिषदेच्या अनेक प्राथमिक शांळामध्ये आठवीचे वर्ग सुरु केले आहे,मात्र त्याठिकाणी विज्ञान व गणिताचे शिक्षकच नाहीत.सोबतच विद्यार्थी सेमी इंग्रजीकडे जाऊ इच्छित असला तरी स्थानिक राजकारण व शाळेत इयत्ता आठवीतील अभ्यासक्रमाच्या दृष्टीकोनातून शिक्षक नसतानाही अनेक शाळा समिती मुख्याध्यापक व शिक्षकासोबत वर्ग सुरु करण्याच्या अट्टाहास करु लागल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे जाणवू लागले आहे.इयत्ता आठवी वर्ग सुरु करणार्या शाळामध्ये बीएस्सी बीएड असलेले गणित व विज्ञान विषयाचे किती शिक्षक त्या शाळेत उपलब्ध आहेत अशी विचारणा केल्यावर मात्र शिक्षण विभाग हात वर करते.उलट शिक्षक आम्ही देणार नाही,या अटीवरच वर्ग सुरु करण्याची परवानगी देत असल्याचे स्पष्ट करुन विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ खेळत असल्याचे स्पष्ट झाले आहे,अशा वेळी जोपर्यंत विज्ञान व गणिताचे शिक्षक आठवी वर्ग सुरु करणार्या शाळेत आहेत की नाही,याची खात्री केल्याशिवाय शाळाव्यवस्थापनांनी सुध्दा मुलांच्या भविष्याशी खेळणे कितपत योग्य अशा चर्चांना आता वेग आलेला आहे.

या नव्या निर्णयानुसार आता ज्या गावापासून पाचवी वर्ग असलेली शाळा एक किमीपेक्षा लांब असेल आणि आठवी वर्गाची शाळा तीन किमीपेक्षा दूर असेल, अशा गावातील जिल्हा परिषदेच्या शाळांना हे वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्याचा शासनाचा निर्णय आहे.मात्र जर गावात व गावाशेजारीच शाळा असेल तर असे वर्ग सुरू करण्यास परवानगी दिली जाणार नाही असे सुद्धा शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.दरम्यान, हे वर्ग सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर त्या शाळेच्या सुविधांची पडताळणी होणे आवश्यक असते,पण ती पडताळणी न होताच स्थानिक राजकारणातील वर्चस्वाच्या लढाईतच अनेक शांळाना वर्ग सुरु करण्याची परवानगी दिली गेल्याने आज गोंदिया जिल्ह्यातील काही अपवादात्मक शाळा वगळता जिल्हा परिषदेच्या ज्या प्राथमिक शाळामध्ये आठवीचे वर्ग सुरु करण्यात आलेत,तेथील परिस्थिती बिकट दिसून येत आहे.

## गोंदिया पोलिसासमोर जहाल नक्षल्याचे आत्मसमर्पण



**गोंदिया–**अनेक नक्षल कारवायांमध्ये सहभाग असलेल्या व ३.५० लाख रुपयांचा बक्षिस असलेला मिलिंद तेलतुंबडेचा अंगरक्षक राहिलेला प्लाटून मेंबर देवसू उर्फ देसू या जहाल नक्षल्याने १९ मे रोजी गोंदिया पोलिसांपुढे आत्मसमर्पण करून शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याचा निर्णय घेतला आहे.

देवसू उर्फ देसु (मूळ नाव – देवा राजा सोडी), वय २४ रा. चीटिंगपारा/ गुंडम, पोस्ट – पामेड, पो. स्टे. तर्रेम, तालुका– उसूर, जिल्हा– बिजापूर (छ. ग.) पद – सदस्य, प्लाटून मेंबर (सीसी मेंबर दिपक उर्फ मिलिंद तेलतुंबडे (मृत) याचा बॉडी गार्ड ) असे आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्याचे नाव आहे.

जिल्हा पोलीसांनी आत्मसमर्पण करीता केलेले आवाहन, माओवादी संघटनेतील वरिष्ठ नेत्यांच्या पिळवणूक आणि अत्याचारास कंटाळून, तसेच माओवादी संघटनेतील अतिशय कठीण वेदनामयी जीवनाला कंटाळून देवसू उर्फ देसु याने जिल्हाधिकारी प्रजित नायर, पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक नित्यानंद झा यांचेसमक्ष आत्मसमर्पण केले.

माओवादी देवसू याने २०१७–२०२२ मध्ये माओवादी संघटनेत कार्यरत असताना गोंदिया जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात घडलेल्या विविध गुन्ह्यात सहभागी असल्याचे कबूल केले आहे. यात २०१८ मध्ये जिल्ह्यातील चिचगड पोलीस ठाण्यांतर्गत कोसबी जंगल परिसरात पोलिस माओवादी चकमकीत सहभागी. असतानाच तुमडिकसा जंगल परिसरात पोलिस माओवादी चकमकीत सहभागी होता. त्याचबरोबर २०१९ या वर्षी छत्तीसगडच्या राजनांदगाव जिल्ह्यातील गातापार पोलीस ठाण्यांतर्गत तांडा जंगल परिसरात पोलिस माओवादी चकमक, बकोदा (कान्हा भोरमदेव एरिया) जंगल परिसरात पोलिस माओवादी चकमक व २०१२ मध्ये गडचिरोली जिल्ह्यातील मर्दीनटोला जंगल परिसरात पोलिस माओवादी चकमकीत सहभागी असल्याचे त्याने सांगितले.

### वर्षभरात तीन नक्षल्यांचे आत्मसमर्पण...

गोंदिया जिल्हा पोलीस दलाच्या प्रभावी नक्षलविरोधी मोहिमेमुळे सन २०२४–२०२५ या वर्षात तीन जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केला असून २०२४ मध्ये संजय पुनेम व देवा मुडाम या दोन माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले होते.

### जलसाठा झपाट्याने खालावला

**गोंदिया** जिल्ह्यात सध्या जलसाठा झपाट्याने खालावला आहे. वाढत्या उन्हामुळे होणारे बाष्पीभवन, बेसुमार पाण्याचा उपसा व अपव्यय यामुळे पाण्याची पातळी कमी होत आहे.

जिल्हयातील अनेक धरणे आणि जलाशयांनी तळ गाठला आहे. जिल्ह्यातील ७० मध्यम, लघु व मामा तलावांत मार्च महिन्यात ५७ टक्के जलसाठा होता. आज स्थितीत केवळ १६.७१ टक्केच जलसाठा आहे. ज्यामुळे अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची शक्यता वाढली आहे. महिनाभर तरी पाणी जपून वापरण्याची गरज आहे. उल्लेखनिय म्हणजे गत वर्षीयाच तारखेत ५४.३५ टक्के जलसाठा शिल्लक होता.

तलाव व पावसाचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील आठही तालुक्यांत गतवर्षीच्या पावसाळ्यात अतिवृष्टीची नोंद झाली. जून ते सप्टेंबरच्या कालावधीत जिल्ह्यात ११ टक्के जास्त पाऊस झाला. यामुळे जिल्ह्यातील लघु पाटबंधारे विभागाच्या मध्यम, लघु व मामा तलावांत ९८ टक्के साठा संग्रहित झाला होता.मार्चमध्ये ५६.८९ टक्के तर आज स्थितीत तिन्ही प्रकल्पांमध्ये केवळ १६.७१ टक्के साठा आहे.बोदलकसा १९.७२, चोरखमारा १५.५७, चुलबंद २७.९३, खैरबंधा २३.८७, मानागड १६.३५, रेंगेपार २१.१२, संग्रामपूर १५.६२, कटंगी २.५१ आणि कलपाथरी १.०८ असा १७.८३ टक्के साठा आहे. गतवर्षी याच तारखेत ५५.५ टक्के साठा होता. २३ लघु प्रकल्पांत आज स्थितीत १७.५० टक्के साठा आहे.

## पाच जहाल माओवाद्यांना गडचिरोली पोलिसांनी केले अटक,साहित्य हस्तगत



**गडचिरोली:** भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम बिनागुंडा येथे घातपात घडवण्याच्या तयारीत असलेल्या ५ जहाल नक्षलवाद्यांना अटक करण्यात पोलिसांना यश आले. यात एका विभागीय समितीच्या महिला सदस्याचा समावेश आहे. या सर्वांवर महाराष्ट्र शासनाचे एकूण ३६ लाखांचे बक्षीस होते. उंगी मंगरु होयाम ऊर्फ सुमली (२८, छत्तीसगड), पल्लवी केसा मिडीयम ऊर्फ बंडी(१९, छत्तीसगड), देवे कोसा पोडीयाम ऊर्फ सबिता (१९, छत्तीसगड) अशी अटक केलेल्या नक्षलवाद्यांची नावे असून उर्वरित दोघांच्या वयाबाबत शंका असल्याने त्यांची नावे जाहीर करण्यात आली नाही.गडचिरोली पोलीस दलाच्या प्रभावी कारवाईमुळे जानेवारी २०२२ ते आतापर्यंत एकुण १०३ माओवाद्यांना अटक करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश आले आहे.

नक्षलवाद्यांचा ङ्गटीसीओसीफ कालावधी सुरु असल्याने यादरम्यान ते घातपात घडवून आणतात. नक्षलवाद्यांचे गड समजले जाणाऱ्या अबुझमाड परिसरात येत असलेल्या भामरागड तालुक्यातील बिनागुंडा या अतिसंवेदनशील गावात ५० ते ६० च्या संख्येने नक्षलवादी एकत्र आले होते.

पोलीस अधीक्षक नीलोत्पल याना ही गोपनीय माहिती मिळताच त्यांनी पोलीस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या नेतृत्वात सी–६० चे ८ पथक आणि सीआरपीएफ तुकडीला अभियानासाठी १८ मे रोजी रवाना केले.

१९ मे रोजी सकाळी सि–६० पथके माओवादविरोधी अभियान राबवित असताना बिनागुंडा गावाला शिताफीने घेराबंदी करुन गावामध्ये शोध घेण्यास सुरुवात केली असता, काही हिरवे–काळे गणवेश परिधान केलेले व काही साध्या वेशातील हत्यारासह असलेले संशयीत व्यक्ती पोलीस पथकावर घातपात करण्याची योजना आखत असल्याचे दिसून आले. गावामध्ये सामान्य नागरिक देखील असल्याने पोलीस पथकाने गोळीबार न करता अंत्यंत शिताफीने पाच माओवाद्यांना त्यांच्याकडील हत्यारासह ताब्यात घेतले. यावेळी इतर माओवादी गावाचा व जंगल परिसराचा फायदा घेत त्या ठिकाणावरुन पळून जाण्यास यशस्वी झाले.

सदरची कारवाई विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदिप पाटील, पोलीस उप–महानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र अंकित गोयल, उप–महानिरीक्षक (अभियान) सीआरपीएफ अजय कुमार शर्मा, पोलीस अधीक्षक गडचिरोली. नीलोत्पल, कमांडंट ३७ बटा. सिआरपीएफ, दाओ इंजिरकान कींडो, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक, अहेरी सत्य साई कार्तिक, पोलीस उप–अधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे व उपविभागीय पोलीस अधिकारी भामरागड अमर मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली विशेष अभियान पथकाचे अधिकारी व जवान यांनी पार पाडली.

## अखेर छगन भुजबळांनी घेतली मंत्रीपदाची शपथ

**मुंबई:–**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ आज मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. राजभवनात सकाळी छगन भुजबळ यांचा शपथविधीचा सोहळा पार पडला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्याकडे असलेल्या खात्याची जबाबदारी आता छगन भुजबळ यांना दिली जाणार असल्याची माहिती मिळत आहे. छगन भुजबळांच्या शपथविधीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुतीतील मंत्री आणि प्रमुख नेते उपस्थित होते.

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते असतानाही छगन भुजबळांना महायुतीच्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले नव्हते. त्यामुळे ते नाराज असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरु होती. मंत्रिपद न मिळाल्याची खंत त्यांनी अनेकवेळा व्यक्त केली असून, त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवारांवरही थेट टीका केली होती. मात्र, आता भुजबळांची ही नाराजी दूर होण्याची शक्यता आहे.

छगन भुजबळ यांचा जन्म १५ ऑक्टोबर, १९४७ रोजी नाशिक येथे झाला. त्यांनी मुंबईतील व्ही. जे. टी. आय.मधून मेकॅनिकल इंजिनियरिंगमधील पदविकेपर्यंतचे शिक्षण घेतले आहे. तरुणपणीच त्यांनी शेती व शेतीवर आधारित व्यवसाय केला. त्यामुळे त्यांना शेतीची आवड निर्माण झाली. मात्र शेतीसोबतच अगदी सुरुवातीपासून राज्याच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात देखील त्यांना रस होता त्यामुळे ते राजकारणाकडे वळाले.



अजित पवारांनी मंत्रिमंडळात डावलल्यानंतर छगन भुजबळांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली होती. त्या वेळी फडणवीसांनी त्यांना संयम राखण्याचा सल्ला दिला होता. मागील सरकारमध्ये छगन भुजबळ यांच्याकडे अन्न आणि नागरी पुरवठा खात्याची जबाबदारी होती. मात्र नंतर हे खाते धनंजय मुंडे यांच्याकडे सोपवण्यात आले होते. आता हेच खाते पुन्हा एकदा धनंजय मुंडेंकडे जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**छगन भुजबळांची पहिली प्रतिक्रिया**

छगन भुजबळ यांनी शपथविधीआधी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, तसेच सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांचे मी मनापासून आभार मानतो. त्याचप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचेही मी ऋण व्यक्त करतो. येवला–लासलगाव मतदारसंघातील जनतेचे, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांचे, तसेच समता परिषदेचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे मी विशेषतः आभार मानतो.

मंत्रीपदाबाबतचा निर्णय आठ दिवसांपूर्वीच झाला होता. एका बैठकीतच हे निश्चित करण्यात आले होते. सोमवारऐवजी मंगळवारीच शपथविधी होईल, असे तेव्हाच ठरवण्यात आले होते. कारण मंगळवारी मंत्रीमंडळातील नेते व इतर महत्त्वाचे पदाधिकारी उपस्थित राहू शकतात, त्यामुळेच हा दिवस निवडण्यात आला आहे.ज्याचा शेवट चांगला त्याचं सर्व चांगलं, असे त्यांनी म्हटले आहे.

## संपादकीय

# सर्व पक्षीय शिष्टमंडळ, भारताची एकजूट

पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय महिलांच्या कपाळाचे कुंकू पुसल्याबद्दल त्यांना अद्दल घडवण्यासाठी मोदींनी पाकविरुद्ध जोरदार युद्धसदृष्य हालचाली केल्या आणि शंभर दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. मुरीदके, बहावलपूर आदी ठिकाणच्या दहशतवादी अड्डयांवर लष्कराने जोरदार हल्ले चढवून दहशतवाद्यांना ठार केले. त्यातच कंदाहार येथील विमान अपहरण प्रकरणात हवा असलेला दहशतवादी अझर मसूद याचे कुटुंबीय मुरीदके येथील हल्ल्यात ठार झाले. लष्कराच्या हल्ल्यात पाकचे दहशतवादी आणि पाकचे सैनिकही ठार झाले आणि पाकला चांगलाच धडा शिकवला गेला. पाकने शरणागती पत्करली आणि पाक दाती तृण धरून शरण आला. पण मोदी यांनी आता पाकला राजनैतिक पातळीवरही नामोहरम करण्याचे धोरण स्वीकारले आहे आणि त्यांनी हा राजनैतिक सर्जिकल स्ट्राईक अत्यंत जोरदार केला आहे.

पाकचे प्रथम पाणी बंद केले, नंतर पाकला जाणारी निर्यात थांबवली आणि आता तर तुर्कस्थानला धडा शिकवला आहे कारण त्याने पाकला मदत केली याचे प्रायश्चित्त त्याला देण्यात आले आहे. त्याच्याशी सर्व प्रकारचे संबंध तोडून आणि त्याच्याशी असलेले आर्थिक संबंध तोडून पण पाकसाठी हे पुरेसे नाही, कारण पाक कधीही आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला काही करू शकत नसला तरीही भारताला त्रास देत रहाणार हे ओळखून मोदी यांनी आता हा राजनैतिक ऑफेन्सिव्ह म्हणजे पाकचे सर्वकंष पर्दाफाश करण्याचा निर्णय घेतला आहे. हा मोदी यांचा मास्टर स्ट्रोक आहे. या सीझफायरमध्ये भारत ड्रोन्स किंवा क्षेपणास्त्रे डागणार नाही, तर पाकला पुरता एक्सपोझ करणार आहे. भारत आता सात उच्च शक्तीशाली पक्षांची शिष्टमंडळे जगातील विविध प्रमुख देशांना पाठवणार आहे आणि त्यांना हे पटवून देणार आहे की भारत हाच पाक पुरस्कृत दहशतवादाचा शिकार झालेला देश आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व चार एनडीएचे खासदार आणि तीन विरोधी पक्षांचे खासदार करणार आहेत. हे शिष्टमंडळ जगातील प्रमुख आंतरराष्ट्रीय राजधान्यांमध्ये जाऊन सीमावर्ती दहशतवादाविरोधात प्रबळ सहमती तयार करण्याचा प्रयत्न करेल. या डावपेचात्मक चालीमागे भारताची राष्ट्रीय ऐक्य जगासमोर एकसंधपणे आणण्याचा हेतू तर आहेच पण असा एक संदेश जगभर देण्याचा प्रयत्न आहे की, भारत यापुढे कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन करणार नाही आणि जागतिक नेत्यांनी याची दखल घ्यावी. यामुळे जागतिक नेते भारताच्या या कृत्याची दखल घेऊन पाकविरोधात ही भारताची पुढील कृती विचारात घेतील आणि पाकच्या कोणत्याही दुस्साहसाला पाठिंबा देणार नाहीत.

सर्व पक्षीय शिष्टमंडळ भारताची राष्ट्रीय सहमती आणि दहशतवादाला कोणत्याही स्वरूपात मुकाबला करण्याचे भारताचे धोरण जगासमोर आणतील. दहशतवाद कोणत्याही स्वरूपातील आणि आविष्कारातील हा भारतासाठी अस्वीकारार्ह आहे हे पटवण्याचा हे नेते करतील. देशाचा जो संदेश आहे की, कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन करणार नाही हा संदेश जगाला देतील. दुसरे म्हणजे देशांतर्गत लोकांना भारताच्या या कृतीत सर्व पक्ष सहभागी आहेत हा एक मोठा संदेश देण्याचा प्रयत्न मोदी सरकारचा आहे. हा अतिशय स्तुत्य प्रयत्न आहे. कारण विरोधी पक्षांकडून सरकारवर जी संभाव्य टीका होणार आहे ती आपोआपच खाली बसेल आणि सरकारविरोधात आक्षेप घेणाऱ्यांना परस्परच उत्तर मिळेल. ऑपरेशन सिंदूरनंतर भारतीयांची सूडाची इच्छा काही अंशी पूर्ण झाली आहे पण भारतातील काही ङ्गआस्तिनके सापफ आहेत त्यांची वळवळ या निमित्ताने समोर आली होती. ती आता थंड होणार आहे. त्यातल्या त्यात अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केली असा जो आरोप मोदी सरकारवर केला जातो तो धुऊन काढण्याचा सरकारचा निर्धार आहे आणि तो या कृतीने बराचसा साध्य होणार आहे. या पूर्वीही भारताने असाच प्रयोग केला होता आणि भारतातील राजकीय पक्ष संकटाच्या समयी एक होतात असा जो संदेश गेला होता त्याला पुष्टी मिळाली आहे.

या आधी तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांनी जिनिव्हाला पाठवण्यासाठी शिष्टमंडळाच्या नेतेपदी तत्कालीन विरोधी पक्ष नेते अटलबिहारी वाजपेयी यांची निवड केली होती. पाकने आणलेल्या ठरावावर भारताची भूमिका प्रबळपणे मांडण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघात भारताची भूमिका अधिक प्रबळ करण्यासाठी १९९४ मध्ये हे शिष्टमंडळ जिनिव्हाला गेले होते. या शिष्टमंडळात तेव्हाचे काश्मीरचे मुख्यमंत्री आणि सध्याचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला याचे वडील, सलमान खुर्शिद आणि मनमोहन सिंग तसेच ई अहमद यांचा समावेश केला होता.

तोच संदेश मोदी सरकारने देण्याचा प्रयत्न केला आहे आणि यामुळे या शिष्टमंडळात शशी थरूर, रवीशंकर प्रसाद, संजय कुमार झा, वैजयंत पांडा, कनिमोझ, सुप्रिया सुळे आदींचा समावेश करणार आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्यासाठी काँग्रेसचे शशी थरूर यांची निवड झाली आणि त्यामुळे राहुल गांधी याचा पोटशूळ उठला.

कारण काँग्रेसने मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध केला पाहिजे असे त्यांचे धोरण आहे, पण राहुल यांचे हे धोरण थरूर असोत की काँग्रेसला फारसे पसंत नाही, त्यामुळे थरूर हे शिष्टमंडळात सामील झाले आणि त्यांनी नेतृत्व करण्याचे मान्य केले आहे. पण ते असो. अशा संकट समयी तरी आपसतील मतभेद समोर आणू नयेत असे शिष्टाचार सांगतो. पण काँग्रेस आणि त्यापेक्षाही पाकिस्तानची भाषा बोलणाऱ्या राहुल यांना ते मान्य नाही. पण किरण रिजिजू म्हणाले ते या क्षणी महत्वाचे आहे. ते म्हणजे संकट समयी आम्ही एकजूट आहोत आणि हे जगाला दाखवण्याची हीच अत्यंत योग्य वेळ आहे. दहशतवादाबद्दल शून्य सहिष्णुता असा संदेश घेऊन हे शिष्टमंडळ महत्त्वाच्या ठिकाणी फिरणार आहे आणि ही बाब सर्वात महत्त्वाची आहे. प्रमुख भागीदार राष्ट्रांना भेट आणि भारताच्या राष्ट्रीय एक्याचे प्रतिबिंब मतभेदांच्या पलीकडे जाऊन आहे हे सर्वात महत्त्वाचे आहे. अशा अवघड समयी भारत एकजूट आहे हे जगाला दाखवणे जास्त महत्त्वाचे आहे.

# ‘जलतारा’ सिंचन समृद्धीचा एक नवा मार्ग

पाणी हीच खरी संपत्ती आहे, हे आज संपूर्ण जगाला पटले आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांत वर्षानुवर्षे पावसावर अवलंबून शेती केली जाते. मात्र, अनियमित पावसामुळे अनेक शेतकरी संकटात सापडतात. अशा वेळी जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित होते. मजलताराफ हा उपक्रम म्हणजे पाण्याचे संपूर्ण नियोजन करून सिंचनाच्या माध्यमातून शेती, पशुपालन आणि पाणी समृद्ध करण्याचा एक व्यापक प्रयत्न होय.

“जलतारा’ ही एक प्रभावी जलसंधारण योजना आहे. यामध्ये ग्रामस्थांच्या सहभागाने भूजल पुनर्भरण, शोषखड्डे, गाळ काढणे आणि पाणी अडविणारे इतर उपाय योजले जातात. याचा उद्देश आहे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरवणे आणि पाण्याचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे.

या उपक्रमाचे होणारे अपेक्षित फायदे:

भूजल पातळीत वाढ , त्यामुळे विहिरी, बोअर्स यांना पाणी मिळते.शेतीची उत्पादकता वाढते आणि बहुपीक पद्धती शक्य होते. पशुपालनाला चालना मिळते, कारण वर्षभर पाणी उपलब्ध राहते.

स्थानिक रोजगार उपलब्ध होतो, कारण कामे ग्रामस्थांच्या सहभागाने केली जातात.

हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्याच्या क्षमतेत निश्चित वाढ होईल. जिल्हा प्रशासन आणि मृद व जलसंधारण, कृषी विभाग व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मजलताराफ उपक्रम ही एक लोकचळवळ झाली आहे. ग्रामपंचायत, शाळा, स्वयंसेवी संस्था यांच्या सहभागाने हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.



जलतारा म्हणजे केवळ एक योजना नाही, तर ही पिढ्यांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी आहे. प्रत्येकाने पुढे येऊन या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला, तर “पाण्याने भरलेले तळे आणि सुखसमृद्ध गाव’ हे स्वप्न नक्कीच साकार होईल.

जलतारा उपक्रम हा शेतकऱ्यांच्या स्वावलंबनासाठी एक ठोस पाऊल आहे. पाण्याचा शाश्वत स्रोत निर्माण झाला तर शेतकरी संकटातून बाहेर येऊ शकतो. मी नुकत्याच जिल्हा दौऱ्यात प्रत्यक्ष काही गावांना भेट दिली. तेथे जलतारा अंतर्गत झालेले काम पाहून समाधान वाटले. शेतकऱ्यांनी आता सेंद्रिय शेती, बहुपीक पद्धती व जलव्यवस्थापनाकडे वळले पाहिजे. शासन, प्रशासन आणि लोकसहभाग यामुळेच मजलताराफ सारख्या उपक्रमांना यश मिळते. हे काम हे केवळ पाणी अडवण्याचे नाही, तर भविष्य घडवण्याचे काम आहे.वाशिम जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या आपसूकच कमी होतील हे निश्चित..!

**ऍड निलेश हेलोंडे**
अध्यक्ष , कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य

**जलतारा उपक्रम हा केवळ जलसंधारणापुरता मर्यादित नाही, तर तो पर्यावरणीय परिवर्तन घडवतो. वाशिम जिल्ह्यात आम्ही ङ्गजलताराफ उपक्रमाला एक लोकचळवळ म्हणून उभं करत आहोत. ग्रामस्थांचा सहभाग, नियोजनबद्ध अंमलबजावणी आणि तांत्रिक मार्गदर्शन या त्रिसूत्रीवर आधारित हा उपक्रम भविष्यात अमूल्य ठरणार आहे. पाणी हे सर्वसामान्यांचं हक्काचं साधन आहे आणि ते जपणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.**

**जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस**

**जलतारा उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी म्हणजे प्रशासन आणि जनतेच्या संयुक्त प्रयत्नांचे उत्तम उदाहरण आहे. आम्ही अनेक गावांमध्ये पाहिलं आहे की, लोकसहभाग आणि वैज्ञानिक पद्धती यांचा समन्वय साधल्यास पाण्याची शाश्वत उपलब्धता सुनिश्चित होऊ शकते. जलतारा उपक्रमाने पाण्याच्या बाबतीत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल होणार आहे. इच्छाशक्ती आणि नियोजन हेच या उपक्रमाचे खरे बलस्थान आहे.**

**उपजिल्हाधिकारी (रोहयो) कैलास देवरे**

# प्रलंबित मागण्यांसाठी कृषी सहायकांचे धरणे आंदोलन



### अशा आहेत मागण्या

**कृषी सहायकांना ग्रामस्तरावर मदतनीस द्यावे, निविष्ठा वाटपात सुसूत्रता यावी, सहायकांना वाहतूक भाडे द्यावे, अन्यथा निविष्ठा वाटपावर बहिष्कार टाकला जाईल. कृषी विभागाच्या आकृतिबंधास तत्काळ मंजुरी द्यावी, कृषी सहायकांचे प्रमाण ४:१ करावे, पोकरा योजनेत समूह सहायकांची पदे पूर्वीप्रमाणे भरावी, मनरेगा योजनेंतर्गत लक्ष्यांक देताना क्षेत्रीय स्तरावरील अडचणींचा विचार व्हावा, नैसर्गिक पंचनामा करताना महसूल, ग्रामविकास व कृषी विभागाच्या जबाबदाऱ्यांबाबत योग्य न्यायसंगत कार्यपद्धती निश्चित करावी, सिल्लोड येथील कृषी सहायकाने आत्महत्या केली, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी.**

**गोंदिया :–** राज्य शासनाने कृषी सहायकांच्या प्रलंबित मागण्यांची पुर्तता करण्याचे आश्वासन दिले. मात्र आश्वासनाचा विसर पडला आहे. त्या मागण्यांच्या पुर्ततेसाठी महाराज्य राज्य कृषी सहायक संघटनेच्या वतीने राज्यव्यापी धरणे आंदोलनाचीहाक दिली. या आंदोलनात गोंदिया जिल्ह्यातील कृषी सहायक सहभागी झाले आहेत. १९ मे रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. दरम्यान निदर्शनेही करण्यात आली.

राज्यातील कृषी सहाय्यकांनी विविध प्रलंबित मागण्यांना घेवून आंदोलन केले. दरम्यान आंदोलनाची दखल घेत कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी येत्या पंधरा दिवसात मागण्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. परंतु आश्वासनाची पुर्तता अद्यापपर्यंत करण्यात आली नाही. परिणामी महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने आंदोलनाची हाक दिली असून सोमवारपासून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली आहे. या आंदोलनाला

जिल्ह्यातील कृषी सहाय्यक संघटनेने पाठिंबा दर्शविला असून आंदोलनाच्य पहिल्या टप्प्यात काळीफिती लावून कामकाज करण्यात आले आहे. उल्लेखनीय असे की, ऐन खरीप हंगामाच्या सुरुवातीला कृषी सहायक आंदोलनावर गेले आहेत. प्रलंबित मागण्यांना पंधरा दिवसात मार्गी लावू आसे आश्वासन कृषी मंत्र्यांनी दिले. मात्र आश्वासनाच्या पलिकडे काहीही मिळाले नसल्यानि महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेने आंदोलनाची भूमिका अवलंबिली आहे. या आंदोलनाला

जिल्ह्यातील कृषी सहाय्यक संघटनेने पाठिंबा दर्शविला आहे. यामध्ये ५ मे रोजी काळीफिती लावून कामकाज करण्यात आले, ६ मे रोजी सर्व कृषी सहाय्यक शासकीय व्हॉट्स ॲप ग्रुपमधून बाहेर पडले, ७ मे रोजी सर्व तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर कृषी सहा. धरणे आंदोलन करणार, ८ मे रोजी सामूहिक रजा, ९ मे रोजी कर्मचारी ऑनलाईन कामावर बहिष्कार करणार करण्यात आला, तसेच १५ मेपासून सर्व योजनांच्या कामकाजावर बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

त्यातच आज १९ मे रोजी राज्य कृषी सहायक संघटनेच्या नेतृत्वात गोंदियात कृषी सहायकांनी धरणे आंदोलन केले. दरम्यान मागण्यांची पुर्तता करण्यात आली नाही तर खरीप हंगामाच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा इशाराही आंदोलनाच्या माध्यमातून देण्यात आला. याआंदोलनात जिल्ह्यातील सर्व कृषी सहायह सहभागी झाले होते. शिष्टमंडळाच्या वतीने उपविभागीय अधिकारी मार्फत राज्य शासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

## ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉ. नारळीकर यांचे निधन

**पुणे:–**ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. पुण्यातील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पहाटे झोपेतच त्यांची प्राणज्योत मालवली. वयाच्या ८६ व्या वर्षी जयंत नारळीकर यांनी जगाचा निरोप घेतला. डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनाने सर्व स्तरातून शोक व्यक्त केला जात आहे.आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्यांचा खगोल शास्त्रातील अधिकार मान्य झाला होता असे जयंत नारळीकर तेवढ्याच रसाळ भाषेत मराठी विज्ञानकथा लिहण्यासाठी देखील लोकप्रिय होते. केंब्रीज विद्यापीठातून शिक्षण घेतल्यावर ते भारतात परतले. आधी टाटा मुलभूत संशोधन संस्थेत त्यांनी काम केले. त्यानंतर आयुका संस्थेच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. २०२१मध्ये नाशिकमध्ये झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते?. पहाटे झोपेतच त्यांची प्राणज्योत मालवली. जयंत नारळीकर यांचा जन्म कोल्हापूरमध्ये झाला होता. त्यांचे वडील बनारस हिंदू विद्यापीठात शास्त्रज्ञ होते.

## पॉलिटेक्निक प्रवेशप्रक्रिया २० मेपासून सुरु

**वाशिम–** तंत्रशिक्षण संचालनालयाच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता राज्यातील अभियांत्रिकी पदविका (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रमाची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि. २० मे पासून सुरु झाली आहे. १६ जूनपर्यंत प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाइन नोंदणी करणे, कागदपत्राच्या स्कंन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे, आणि अर्ज निश्चिती करणे इ.या htt{s://poly25.dtemaharashtra.gov.in/ संकेतस्थळावर करता येईल.

# चिन्नौर तांदळाला चालना देण्यासाठी खा.पडोलेची केंद्र सरकारकडे राइस मिल स्थापनेसाठी मागणी

**गोंदिया: –** भंडारा, गोंदिया आणि शेजारच्या बालाघाट जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाणाऱ्या सुगंधी आणि उच्च प्रतीच्या चिन्नौर तांदळाला आता देश–विदेशात ओळख मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. भंडारा–गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. प्रशांत यादवरावजी पडोले यांनी केंद्रीय कृषी मंत्री श्री. शिवराजसिंह चौहान जी याची आज नागपुर येथे भेंट करुण या भागात केंद्र सरकारच्या योजना अंतर्गत आधुनिक राइस मिल मंजूर करण्याची मागणी केली आहे.

खासदार डॉ. पडोले यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, या भागात चिन्नौर तांदळाची मोठ्या प्रमाणावर शेती होत असून, त्याची चव, सुगंध आणि गुणवत्ता देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात अत्यंत लोकप्रिय आहे. मात्र दुर्दैवाने या भागात पिठासाठी (पिसाईसाठी) आवश्यक असलेली राइस मिल उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांना आपला तांदूळ व्यापाऱ्यांना कमी दरात विकावा लागतो. हे व्यापारी तांदूळ इतर राज्यांमध्ये पाठवून पिसाई करून अधिक नफा कमवतात.

या स्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, स्थानिक बाजारातही चिन्नौर तांदूळ सहज उपलब्ध होत नाही. जर या भागातच आधुनिक राइस मिल सुरू झाली, तर शेतकऱ्यांना योग्य दर मिळेल, स्थानिक युवकांना रोजगार मिळेल आणि चिन्नौर तांदळाचा निर्यात व्यवसायही वाढेल.

प्रधानमंत्री कृषि संपदा योजना किंवा प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत ही राइस मिल मंजूर करून द्यावी, अशी मागणी डॉ. पडोले यांनी केली आहे. त्यासाठी लागणारी जमीन, शेतकरी गट व स्थानिक सहकार्य उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी व चिन्नौर तांदळाला आंतरराष्ट्रीय



दर्जाची ओळख देण्यासाठी ही मागणी महत्त्वाची ठरणार आहे. आता यावर केंद्र सरकार काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# किटकजन्य आजार दुरीकरणासाठी आरोग्य विभागापाठोपाठ एनजीओ सरसावल्या

अभिनेता नाना पाटेकर यांच्या बहुचर्चित मयशवंतफ सिनेमातील मएक मच्छर...फ हा डायलॉग प्रसिद्ध आहे. याच डासाच्या मॲनोफिलिसफ या प्रजातीने गोंदीयाकरांचे जगणे मुश्कील केले आहे. राज्यात मुंबई, चंद्रपुर, गडचिरोली नंतर गोंदिया मध्ये सर्वाधिक मलेरिया रुग्ण आढळतात. जंगलव्याप्त गावे, भात शेती, तलावांचा जिल्हा व कामानिमित्त स्थलांतरण ह्या मुख्यत्व कारणाने राज्यातील शेवटच्या टोकावरील गोंदिया जिल्ह्याला मलेरियाचे महॉटस्पॉटफ बनविण्यामागे खरा मव्हिलनफ्ही हाच डास. व त्याला वाढविण्यामागे मानवच म्हणुन आपण व आपल्या सवयी मुळेच किटकजन्य आजार जसे हिवताप, हत्तीरोग, मेंदुज्वर, चंडिपुरा, चिकुनगुनिया यासारखे आजार बळावत असल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी दिली आहे.

गोंदिया जिल्हा हा भात शेतीसाठी प्रसिद्ध आहे. भात शेतीसाठी पाणीयुक्त चिखलची गरज भासते तसेच तलावांचा जिल्हा म्हणून वेगळी ओळख आहे. तसेच जंगलव्याप्त भाग, घनदाट झाडी व झुडपे यामुळे डास व डास अळीसाठी पोषक वातावरण असते.जिल्ह्यात बाराही महिने हिवताप आजाराचे रुग्ण निघत असतात.त्यामुळे हिवतापाचा जर प्रसार रोखायचा असेल तर मच्छरांसोबत डास अळी सुद्धा नष्ट करणे गरजेचे बनलेले आहे.

गोंदिया जिल्ह्याची सीमा ही मध्य प्रदेश व छत्तीसगड राज्याला व गडचिरोली जिल्ह्याला लागून आहे.दरवर्षी जिल्ह्यातील मजूर हे तेंदू पत्ता, पत्ता सीजन, बास कटाई, बांधकाम, रस्ता कामे व इतर विविध कामानिमित्त स्थलांतरित करीत असतात.परंतु तिथे गेल्याने आपल्या आरोग्याची काळजी न करता दिवस रात्री कामे करुन उघड्यावरती झोपत असतात. गोंदिया लागून असलेल्या सीमा भागात जंगलव्याप्त भाग असल्याने परतीच्या वेळी येताना आजारी किंवा हिवताप संसर्ग घेऊन येण्याची शक्यता असते.

जिल्ह्यात सातही तालुक्यात फैमिली हेल्थ इंडिया एम्बेड प्रोजेक्ट अशासकीय संस्था व तिरोडा येथील शहरी भागात श्री दत्तात्रय प्रभु बहुउद्देशिय संस्था माध्यमातुन मलेरिया,डेंग्यु सारखे आजारांचे निर्मुलनासाठी विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आरोग्य विभाग,हिवताप विभाग, फैमिली हेल्थ इंडिया एम्बेड प्रोजेक्ट व श्री दत्तात्रय प्रभु बहुउद्देशिय संस्था यांच्या एकत्रित सहकार्याने जिल्ह्यात किटकजन्य आजार तसेच मलेरिया आणि डेंग्यू बाबतची जनजागृती करण्यात येत आहे.त्यासाठी अतिसंवेदनशील गावात स्वयंसेवकाच्या माध्यमातुन गावपातळीवर कम्युनिटी स्वयंसेवक/समुपदेशकांची नेमणुक फैमिली हेल्थ इंडिया एम्बेड प्रोजेक्ट व श्री दत्तात्रय प्रभु बहुउद्देशिय संस्था यांनी केले आहे.

किटकजन्य आजाराचा धोका डासांमार्फत होत असतो. त्यामुळे त्यावर प्रतिबंधासाठी जिल्ह्यातील नागरिकांनी दर आठवड्यातून



एक दिवस कोरडा दिवस किवा शनिवारी पाळण्याचे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण यांनी केले आहे.

जिल्हा आरोग्य विभागाच्यावतीने आरोग्य कर्मचारी, आशा सेविका व एनजीओ स्वंयसेवक यांचे मार्फत हिवताप प्रतिबंधात्मक अभियानांतर्गत आठवड्यातून एक दिवस पाण्याचा साठा असलेली सर्व भांडी रिकामी केली जातात. ही भांडी घासून पुसून कोरडी केली जातात आणि घरातील सर्व पाणीसाठे झाकून ठेवण्याचे आवाहन केले जाते. यामुळे डासांचा प्रादुर्भाव रोखण्यात मदत होते, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी सांगितले.

ते म्हणाले, जिल्ह्यातील डासांना बाराही महिने पोषक वातावरण असते.परिणामी डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर होत असते. या डासांमुळे आणि पावसाळ्यातील दूषित पाण्यामुळे कीटकजन्य व जलजन्य आजार उदभवत असतात. या जलजन्य आणि किटकजन्य आजारांना आळा घालण्यासाठी आपापले घर आणि घराच्या परिसरातील सर्व पाणीसाठे रिकामे करणे, कोरडा दिवस पाळणे, पिण्याच्या पाण्याचे साठे झाकून ठेवणे, किटक प्रतिबंधात्मक औषधांची फवारणी करणे आदी उपाययोजना करणे गरजेचे असते.

डेंगी व हिवताप या आजारांचे प्रसार करणारे डास हे घरातील मनिप्लांट, फ्रिज, कुलर, जमिनीतील पाण्याची टाकी, प्लास्टिकच्या टाक्या, घराच्या परिसरात पडून असलेले आणि वापरात नसलेले टायर, प्लास्टिक कुंड्या, प्लास्टिकच्या वस्तूंमध्ये साठलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालत असतात. याला आळा घालण्यासाठी आरोग्य विभागाच्या जोडीला लोकसहभाग महत्त्वाचा असतो.

कोरडा दिवस पाळताना परिसरातील साचलेले डबके, नाल्या वाहते करणे, बुजविणे, डासोत्पत्ती स्थानात गप्पी मासे सोडणे, शेणाचे, खताचे उकीरडे गाववेशीपासून ५३९ मिटर दूर अंतरावर हलविणे, मच्छरदाणीचा वापर, संडासच्या व्हेंट पाईपला जाळी बसविणे. पिण्याचे पाणी झाकून व उचावर ठेवणे, परिसर व वैयक्तिक स्वच्छता ठेवण्याचे आवाहन जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.अमरिश यांनी केले आहे.

७ दिवसांत होतो ‘प्रौढ’ ‘ॲनोफिलिस’ डासाचे उत्पत्ती ठिकाण हे स्वच्छ पाणी, तसेच घनदाट जंगल आहे. जिल्ह्यात ७० टक्के वनक्षेत्र असल्याने त्यास उत्पत्तीसाठी अधिक पोषक वातावरण आहे.हा मादी डास जेमतेम २८ दिवस जगतो, जन्मानंतर सात दिवसांतच तो प्रौढ होतो. अंडी घालण्यास सुरुवात करतो, मरण्यापूर्वी एका डासाच्या कुटुंबाचा विस्तार एक हजारांहून अधिक सदस्यांचा असतो, असे जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.विनोद चव्हाण यांनी सांगितले.

**अशी करा उपाययोजना**

कीटकनाशक, अळी नाशकाची, डासोउत्पत्ती स्थानामध्ये डास अळी भक्षक गप्पी मासे सोडणे, डासांचा उपद्रव पूर्णपणे टाळण्यासाठी पाण्याच्या सर्व टाक्या तसेच पिंप साठे व्यवस्थित झाकून ठेवावेत. इमारतीच्या गच्चीवर आणि परिसरात अनावश्यक पाणी साचू देऊ नये. वैयक्तिक सुरक्षिततेसाठी मच्छरदाणीचा वापर करावा, डास प्रतिबंधक यंत्रे, मलम, अगरबत्तीचा वापर, नारळाच्या करवंट्या, टायर्स,फुलदाण्या, कुलर्स यामध्ये पाणी साचू देऊ नये. आठवड्यातून एक दिवस शनिवार हा कोरडा दिवस म्हणून पाळण्यात यावा, असेआवाहनही डॉ.विनोद चव्हाण यांनी केले.

**नागरिकांनी काय काळजी घ्यावी**

डासांपासून संरक्षणासाठी झोपताना मच्छरदाणीचा वापर करा. घर, घराच्या परिसरात नारळाच्या कवट्या, टायरमध्ये पाणी साचू देऊ नका. डासांना घरात येण्यास रोखण्यासाठी घराच्या खिडक्यांना जाळ्या बसवा.घराच्या परिसरातील अडगळीचे साहित्य नष्ट करा.घर व घराचा परिसर स्वच्छ ठेवा. ताप येताच वैद्यकीय अधिकाऱ्यांचा त्वरित सल्ला घेऊन औषधोपचार सुरु करा. प्रत्येक घरामध्ये शोष खड्डा परसबाग यांची निर्मिती करणे.घरामध्ये हवा व सूर्यप्रकाश खेळता राहील अशी व्यवस्था करणे. शौचालयाचे सेप्टीक टैंक हे डासांचे उत्पत्ती स्थान असल्याने व्हेंन्ट पाईपला जाळी बसवणे.

आठबडयातुन एकदा कोरडा दिवस पाळणे. घरा सभोवतालची गटारे वाहती करणे. बायोगॅस मध्ये जळके तेल अथवा रॉकेल टाकणे. किटकजन्य आजाराबाबत जनजागृती करणे. सार्वजनिक सांडपाणी, गटारी यांची योग्य विल्हेवाट लावणे.

डासोत्पत्ती स्थाने नष्ट करणे. ग्रामपंचायत मार्फतब खड्डे बुजवणे.गप्पी मासे मोठ्या प्रमाणात सोडणे. आवश्यकता भासलेस धुर फवारणी करणे. ताप येताच वैद्यकीय अधिकाऱ्यांचा त्वरित सल्ला घेऊन औषधोपचार सुरु करा. अंगाबर ताप काढू नका.येता कण कण तापाची,करा तपासणी रक्ताची. स्थलांतरीत,पत्ता सिजन मजुरांनी गावी आल्याबरोबर रक्ताची तपासणी अवश्य करावी.

# १.१० लाख विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके



**गोंदिया:–** समग्र शिक्षण अभियानांतर्गत शासनातर्फे जिल्हा परिषद व अनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ते ८ पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वितरित केली जातात. त्यानुसार यावर्षी जिल्ह्यासाठी ६ लाख ६० हजार ९९२ पुस्तकांची मागणी करण्यात आली आहे. ही पाठ्यपुस्तके पुढील आठवड्यापासून जिल्ह्यात दाखल होणार असून, तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकाऱ्यांना वितरित केली जातील. यंदा विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशीच पुस्तके वितरित करण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने यंदा १ लाख १० हजार ३५६ विद्यार्थ्यांसाठी ६.६० लाख पुस्तकांची मागणी केली आहे. कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने शिक्षणाचा अधिकार कायदा लागू केला आहे. त्याअंतर्गत

विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांसह गणवेश देखील दिला जातो. याच योजनेअंतर्गत जिल्हा परिषद, नगर परिषद आणि खासगी अनुदानित शाळांतील इयत्ता १ ते ८ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना बालभारतीची पुस्तके दिली जातात.

**विद्यार्थ्यांची आणि पुस्तकांची संख्या सर्वाधिक**

या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यात १.१० लाख विद्यार्थी नोंदणीकृत आहेत. त्यांच्यासाठी बालभारतीकडून ६.६० लाख पुस्तकांची मागणी करण्यात आली आहे. यामध्ये गोंदिया तालुका सर्वाधिक आघाडीवर असून, येथे २९ हजार ५४० विद्यार्थी नोंदणीकृत असून १ लाख ७९ हजार २१० पुस्तके मागवण्यात आली आहेत. दुसऱ्या क्रमांकावर अर्जुनी मोरगाव तालुका असून, येथे १४ हजार ७१७ विद्यार्थ्यांसाठी ८८ हजार ७६ पुस्तकांची मागणी करण्यात आली आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# अतिक्रमणाच्या कितीही तक्रारी करा, थांबणार तरी कधी?

**गोंदिया :-** शहर परिसरात सातत्याने होणारे अतिक्रमण आणि ते हटवण्यासाठी नगरपालिकेकडून राबविली जाणारी मोहीम ही आता नित्याची बाब झाली आहे. फेरीवाला धोरण निश्चित झाले नसल्यामुळे कोणीही फेरीवाला, विक्रेता, केबिनधारक कुठेही अतिक्रमण करून आपला व्यवसाय करीत आहे; परंतु हे केव्हा तरी थांबले पाहिजे. सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही, यासाठी फेरीवाल्यांना निश्चित झोन ठरवून देऊन व्यवसायाला परवानगी देण्याची भूमिका प्रशासनाला घ्यावी लागणार आहे. शहरात जमिनींचे दर आकाशाला गवसणी घालत आहेत. त्यामुळे एक-एक इंच जागेला महत्त्व आले आहे. शहरात जिथे थोडीशी जरी जागा दिसली तरी अतिक्रमण होत आहे. प्लॉटवर व रस्त्यावर अतिक्रमण वाढले आहे. अतिक्रमणसंदर्भात नागरिकांना तक्रार देण्यासाठी नगरपालिकेशिवाय दुसरा पर्याय नाही. अतिक्रमण हटाव विभागाकडे दरवर्षी किमान शेकडो तक्रारी प्राप्त होतात. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पथक घटनास्थळाची पाहणी करून अतिक्रमण हटवते. बऱ्याचदा तर मोहीम राबविली जाते. मात्र, काही दिवसांत पुन्हा जैसे-थे स्थिती दिसून येते. त्यामुळे अशा अतिक्रमणधारकांवर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.



**नगरपालिकेकडे अतिक्रमण विभाग कार्यरत आहे. त्यांच्याकडे तक्रारी आल्यानंतर ते लगेच तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई करतात. कुणीही शासकीय जागेवर, रस्त्यावर अतिक्रमण करू नये.**

**राजीव जाधव, नगर अभियंता, नगर परिषद, गोंदिया**

## चार महिन्यांत २२ तक्रारी

**नगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडे शहरातील मुख्य, तसेच अंतर्गत रस्त्यांवर अतिक्रमण केल्याच्या, तसेच वैयक्तिक जागेवर अतिक्रमण केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. नाल्याच्या काठावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत आहे. चार महिन्यांत २२ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्याचा तोडगा काढण्यात आला. आता आठ तक्रारींवर काम सुरू आहे.**

# समृद्धी मार्गामुळे होणारे शेतकऱ्यांचे नुकसान थांबवा

**तिरोडा :-** नागपूर-गोंदिया समृद्धीसाठी शेतरक्यांची जमिन संपादित करण्याचे काम सुरू झाले आहे. यामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या वाढत चालल्या आहेत. याबाबत आज १९ मे रोजी शेतकरी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेवून विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे. नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाचा विस्तार आता गोंदियापर्यंत करण्यात येणार आहे. या महामार्गाचे काम सुरूझाले असून जिल्ह्यातील तिरोडा व गोंदिया तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र समृद्धी महाराष्ट्र शासन मुख्यमंत्री मार्गामुळे शेतकऱ्यांचे कुटुंब उद्ध्वस्त होणार आहेत, यामुळे शेतकरी संघर्ष



समितीच्या वतीने आज १९ मे रोजी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात आली.

यावेळी बागायती जमिनीचे जबर संपादन थांबविण्यात यावे, बाजाराच्या तुलनेत अत्यल्प नुकसान भरपाई दिली जात आहे, त्याबाबत विचार करण्यात यावा, पर्यायी रस्त्याची व जल निसारणाची गैरसोय होत आहे, त्याबाबत उपाययोजना करण्यात यावी, बेकायदेशीर चावळी नोटीस व व्यक्तीशः नाव नसलेल्यांची जमिनी अधिग्रहित केले जात आहे, ते थांबविण्यात यावे, प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, शेतकऱ्यांना १.२५ ते दिड कोटी प्रति एकर भरपाई देण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन देण्यात आले आहे.

# खासदारांच्या आढावा बैठकीला अधिकाऱ्यांची दांडी



**अर्जुनी मोरगाव :-** खा. डॉ. प्रशांत पडोळे यांनी शुक्रवारी (दि.१६) जनतेच्या तक्रारी व समस्यांचा आढावा घेण्यासाठी तहसील कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठक आयोजित केली होती, पण आढावा बैठकीला तालुक्यातील अनेक अधिकाऱ्यांनी दांडी मारल्याने खासदार चांगलेच संतापले. बैठकीला माजी आ. दिलीप बनसोड, जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत घाटबांधे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष घनश्याम धामट, बाजार समितीचे उपसभापती अनिल दहिवले, माजी सभापती भागवत पाटील नाकाडे, गंगाधर परशुरामकर उपस्थित होते.

तालुक्यातील जनतेच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी शुक्रवारी खा. पडोळे यांनी शुक्रवारी तहसील कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठक बोलविली होती. या आढावा बैठकीला तालुक्यातील मोजकेच अधिकारी उपस्थित होते. बैठकीत कमी प्रमाणात अधिकाऱ्यांची उपस्थिती पाहून खासदारांना राग अनावर झाला होता. बैठकीला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी पल्लवी वाडेकर, नायब तहसीलदार खुशाल कावडे, तालुका कृषी अधिकारी रवींद्र लांजेवार, वनपरिक्षेत्राधिकारी, उमेदचे तालुका व्यवस्थापक रेशीम नेवारे, पंचायत समिती घरकुल विभागाचे अधिकारी उपस्थित होते. इतर अधिकाऱ्यांनी बैठकीला दांडी मारली. यावेळी तालुक्यातील सरपंच, पदाधिकारी आपल्या गावातून या बैठकीसाठी आपल्या तक्रारीचे निवारण होईल या आशेने आले; परंतु अधिकारीच उपस्थित नसल्याने त्यांना निराश होऊन परतावे लागले.

**तीन विभागावरच गाजली सभा**

नवेगावबांध ग्रामपंचायत चौकशी प्रकरण, बोंडगावदेवी प्रभागसंघ व्यवस्थापक पदमुक्त प्रकरण, घरकुल सर्व्हे व वन विभाग यावरच ही सभा गाजली. देवाजी कापगते यांनी नवेगावबांध ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकाऱ्यांची चौकशी प्रकरण व बोंडगावदेवी प्रभाग संघाच्या व्यवस्थापकाचे पदमुक्त प्रकरण जि.प. सदस्य श्रीकांत घाटबांधे यांनी लावून धरले. यावर योग्य चौकशी करण्यात यावी, असे निर्देश खा. पडोळे यांनी दिले. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी पल्लवी वाडेकर यांनी नवेगावबांध ग्रामपंचायतची पंचायत समितीचे विस्तार अधिकारीमार्फत चौकशी सुरू असून दोषींवर कारवाई केली जाईल, असे सांगितले.

# देवरीत ६५ कोटी रुपये खर्चून होणार नवीन पाणीपुरवठा योजना

**देवरी:-** येथील नगर पंचायत क्षेत्रातील नागरिकांच्या जीवनावश्यक गरजांच्या पूर्ततेसोबतच त्यांच्या सुख सुविधांमध्ये मोलाची भर घालून जीवनमानाचा दर्जा उंचावण्याचा प्रयत्न विविध विकास योजना राबवून नगर पंचायत सातत्याने कार्य करीत आली आहे. या अंतर्गतच नगरोत्थान महाभियानातर्गत ६५ कोटी रुपये किमतीच्या नवीन पाणिपुवठा प्रकल्पाचे भूमिपुजन जि.प.शाळेच्या मागील पाणी टाकीच्या पटांगणावर उत्साहात पार पडले.

शहराच्या नवीन पाणिपुवठा प्रकल्पाचे भूमिपुजन व पायाभरणी सोहळ्याचे उद्घाटन विधान परिषदेचे आमदार डॉ. परिणय फुके यांच्या हस्ते आणि या क्षेत्राचे आमदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

या प्रसंगी देवरीचे नगराध्यक्ष तथा भाजपाचे तालुकाध्यक्ष संजू उईके,विरेन्द्र अंजनकर,देवरी पं.स.चे सभापती अनिल बिसेन, उपसभापती शालीकराम गुरनुले,कल्पनाताई वालोदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रमोद संगीडवार, न.पं.च्या उपाध्यक्ष प्रज्ञाताई संगीडवार, न.पं.च्या बांधकाम व पाणी पुरवठा सभापती



आफताब शेख(अन्नूभाई),अर्थ नियोजन, विकास आणि क्रिडा सभापती संजय दरवडे,महिला व बालकल्याण सभापती सिताबाई रंगारी, नगरसेवक रितेश अग्रवाल, सरबजितसिंग भाटिया,मोहन डोंगरे, नितिनकुमार मेश्राम, पंकज शहारे, महेश जैन,बबलु कुरैशी, नगरसेवीका कौशल्याबाई कुंभरे, सुनिताबाई शाहु, तनुजाताई भेलावे, पिंकीताई कटकवार, कमलबाई मेश्राम,नुतनताई सयाम, हिनाताई टेंभरे यांच्यासह शहरातील प्रतिष्ठीत नागरीक बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्तावीक देवरी न.पं.च्या मुख्याधिकारी कु. करिश्मा वैद्य यांनी तर संचालन प्रवीण दहिकर यांनी केले. आणि उपस्थितांचे आभार न.पं. चे कर्मचारी विजय पटले यांनी मानले.या कार्मक्रमाच्या आयोजना करीता न.पं.चे सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी सहकार्य केले.

# श्रीरामपूरला गावठाण महसुली गाव घोषित करून नाव द्या

**गोरेगाव :-** मौजा गोरेगाव त.सा.क्र. ८ येथे कलपाथरी मध्यम प्रकल्पात गेलेल्या सोनारटोला, भगतटोला व आकोटोला या तिन्ही गावांचे पुनर्वसन सन २००७ मध्ये करून सन २०१५ मध्ये नगरपंचायतीमध्ये घेऊन प्रभाग क्रमांक-१ नाव देण्यात आले. मात्र, अजूनही पुनर्वसन श्रीरामपूरला गावठाण महसुली गाव घोषित करण्यात आले नाही. या पुनर्वसित गावाला गावठाण महसुली गाव घोषित करून श्रीरामपूर नाव देण्यात यावे, अशी मागणी नगरपंचायतीचे माजी बांधकाम सभापती रेवेंद्र बिसेन यांनी केली आहे.

श्रीरामपूर येथील भूखंडाखालील क्षेत्रफळ खुली जागा, सार्वजनिक उपयोगी जागा, सामाजिक वनीकरण, स्मशानभूमी, रस्त्याखालील एकूण क्षेत्रफळ वेगवेगळ्या गटांत वेगवेगळे करून सात-बारा तयार करण्यात यावे, प्लॉटधारकांच्या नावे वेगळी आखीव पत्रिका किंवा सात-बारा करण्यात यावे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी हे सध्या सोनारटोला या नावाने रेकॉर्डला असून, त्यांना श्रीरामपूर पुनर्वसन या नावाने फेरबदल करण्यात यावे. सन २००७ मध्ये पुनर्वसन पट्टे देण्यात आले, असून काही लोकांचे यादीत नाव आहे. पण, त्यांच्या नावाने पट्टे देण्यात आले नाही. काही प्लॉटधारकांचे प्लॉट फेरबदल करण्यात आले होते. पण, त्यांच्या पट्ट्याचे नाव बदलण्यात आले नाही, ते बदलण्यात यावे, अशी मागणी बिसेन यांनी केली आहे. सन २०१७ पासून त्यांची मागणी आहे. मात्र, या मागणीची प्रशासनाने अजूनही दखल घेतलेली नाही. वारंवार पत्रव्यवहार करूनही अजूनही श्रीरामपूर महसुली गाव होण्यापासून वंचित आहे.

## फक्त एक तक्रार, महिनाभरात निर्णय... आणि शिक्षकांची बदली अटळ !

**मुंबई:-**जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या कामाबद्दल आलेल्या तक्रारींन संदर्भात काही बदल करण्यात आले आहे. १८ जून २०२४ च्या सरकारी निर्णयात बदल करत ग्राम विकास विभागाने एक पत्र जारी करून काही गोष्टी स्पष्ट केल्या.नव्या नियमानुसार कोणत्याही शिक्षकाबाबत तक्रार आल्यास त्याची चौकशी करून बदलीचा प्रस्ताव ३० दिवसांच्या आत विभागीय आयुक्तांना पाठविणे अनिवार्य आहे. तर, विभागीय आयुक्तांनाही यावर ३० दिवसांच्या आत योग्य निर्णय घ्यावा लागेल. विभागीय आयुक्तांनी मान्यता दिल्यानंतर ७ दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला शिक्षकाची बदली करावी लागेल. याचाच अर्थ असा की आता केवळ तक्रारीच्या आधारावर शिक्षकांची बदली केली जाणार आहे.

# शिक्षकांवर अन्याय करणारा तो शासन निर्णय रद्द करा



**गडचिरोली :-** शैक्षणिक सत्र २०२४-२५ ची शिक्षक संचमान्यता राज्यातील बहुतांश शाळांना नुकतीच वितरीत करण्यात आलेली आहे. यात प्रामुख्याने संचमान्यतेत राज्यातील अनेक शाळांना शुन्य शिक्षक मंजूर झाल्यामूळे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसमोर गंभीर समस्या निर्माण झाली आहे. त?यामुळे दि. १५ मार्च २०२४ रोजीचा संचमान्यतेबाबतचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत?वात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या कार्यालयासमोर नुकतेच एक दिवसीय विदर्भस्तरीय धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांनी मंत्रालयात शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकजजी भोयर, प्रधान सचिव रणजीत देओल, उपसचिव तुषार महाजन यांची भेट घेऊन विषयाची गंभीरता लक्षात आणून दिली.

दि. २८ ऑगस्ट २०१५ च्या शासन निर्णयानुसार यापूर्वीचे संच निर्धारण होत होते. त्याप्रमाणेच शैक्षणिक सत्र २०२४-२५ चे संच निर्धारण करण्यात यावे व दि. १५ मार्च २०२४ रोजीचा शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करावा, या प्रमुख मागणीसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने झालेल्या धरणे/ निदर्शने आंदोलनाचे निवेदन आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकजजी भोयर, प्रधान सचिव श्री. रणजीत देओल यांना दिले व शिक्षकांवर अन?याय करणारा सदर शासन निर्णय रद्द करावा, अशी मागणी लावून धरली.

## पोलिस पाटील संघटनेची जिल्हा कार्यकारिणी गठित

**गोंदिया :-** महाराष्ट्र गाव कामगार पोलिस पाटील संघटनेची जिल्हास्तरीय बैठक मनोहरसिंह चौहान यांच्या अध्यक्षतेत आणि मोहनसिंह बघेल व कुंजीलाल भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली.या बैठकीत विविध विषयांवर चर्चा करून संघटनेची जिल्हा कार्यकारिणी गठित करण्यात आली.

कार्यकारिणीत संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी लक्ष्मीकांत कोल्हे, सचिव प्रवीण कोचे, उपाध्यक्ष बाबा पाटील चौधरी, सुरेश कोरे, प्रकाश मेश्राम, सहसचिव राहुल बोरकर, कोषाध्यक्ष मनोज बडोले, सहकोषाध्यक्ष झंकारसिंह लिल्हारे, संघटक सुभाष अंबादे, साहेब बंसोड, प्रदीप बावनथडे, प्रसिद्धी प्रमुख छत्रपती पटले, किशोर दोनोडे, जिल्हा प्रतिनिधी प्रशांत हिरकने, ओमप्रकाश शहारे यांची निवड करण्यात आली. तसेच जिल्हा महिला कार्यकारिणीची काही दिवसानंतर गठित करण्याचे ठरविण्यात आले. बैठकीला हिवराज ताजने, राजू कडव, विनोद ठाकूर, प्रकाश मेश्राम, राहुल बोरकर, नर्मदा चुटे, शालू डोंगरे, किशोर दोनोडे, अरविंद चौरे, प्रशांत हिरकने, हितेश सोनवाने, खेमराज कुंभलकर, दिलीप चिचलवार, प्रदीप चुटे, अशोक भांडारकर, ओमेश्वर लाडे, विनायक राखडे, ओमप्रकाश शहारे, लोकचंद बिजेवार, दिनेश कडीनाहाके, सत्यशिला बिसेन, कविता मुरे व अन्य पोलिस पाटील उपस्थित होते.

# पाच वर्षात जिल्ह्यात ३३ वीज बळी

**गोंदिया:-** पावसाळा कित्येकांना हवाहवासा वाटतो. मात्र बहुतांश वेळा पावसाळ्यात पावसासह वीज पडून माणूसच नव्हे तर, पशुंचाही नाहक जीव जातो. जिल्ह्यात सुद्धा अशा घटना घडल्या असून मागील पाच वर्षात तब्बल ३३ जणांचा वीज पडून मृत्यू झाला आहे. तर हे वर्षही सुटले नसून एप्रिल महिन्यात तिरोडा तालुक्यात महिलेचा जीव गेला आहे.

पावसाळा आता तोंडावर आला असून यंदा मान्सून लवकर येणार असल्याचा अंदाज लावला जात आहे. मान्सून म्हणजे चार महिन्यांच्या रखरखत्या उन्हापासून सुटका. पावसाचे पाणी अंगावर घेऊन उन्हाळ्याला अलविदा म्हणण्यात कित्येकांना आनंद येतो. त्यातही लहान मुलांना तर पाऊस आला म्हणजे त्यात भिजण्यापासून अडविणे शक्यच नसते. ७ जूनपासून मान्सून लागतो असे म्हटले जाते. मात्र यंदा मान्सून लवकर येणार असे म्हटले जात असून त्यानुसार मागील काही दिवसांपासून दररोज ढगाळ वातावरण व मधामधात पावसाच्या सरी बरसून त्याची प्रचिती आणून देत आहे. पावसाळ्यात कधी पाऊस हजेरी लावणार याची शक्यता नसते. पाऊस आला तर काही धोका नाही मात्र त्यात विजांचा कडकडाट धोकादायक असून कधी वीज पडणार याचा नेम नसतो. यात कुणाच्या अंगावर वीज पडली तर मात्र मृत्यू अटळ आहे. विजेमुळे जिल्ह्यात सन २०२० ते २०२४ या पाच वर्षाच्या कालावधीत तब्बल ३३ जणांचा जीव गेला आहे.

### एप्रिल महिन्यात महिलेने गमावला जीव

**जिल्ह्यात एप्रिल महिन्यापासून अवकाळी पावसाचा खेळ सुरू आहे. यातच २७ एप्रिल रोजी तिरोडा तालुक्यातील ग्राम बिस्सी निवासी महिला मंगला विनोद बोरकर (५०) या सांयकाळी शेतात शेळ्या चारण्यासाठी गेल्या असता अंगावर वीज पडून त्यांचा जीव गेला.**

### वर्षनिहाय वीज पडून मृतांचा तक्ता

| वर्ष | मृत्यूचा महिना |
|---|---|
| २०२०- | जून-१, जुलै-५, ऑगस्ट-२, सप्टेंबर-१ |
| २०२१- | मे-२, जून-४, सप्टेंबर-१, ऑक्टोबर-१ |
| २०२२- | मे-२, जून-४, जुलै-१ |
| २०२३- | मे-१, जुलै-४ |
| २०२४- | जून-२, जुलै-२ |
| २०२५- | एप्रिल-१ |

# कर्जमुक्तीसाठी शेतकऱ्यांचा एल्गार; अर्जासह हजारो शेतकऱ्यांची तहसीलवर धडक

**गोंदिया :-** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर महायुती घटक पक्षांनी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे जाहिर आश्वासन दिले होते. तसेच सत्तेत येताच शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देणार, असे आश्वासन दिले होते. परंतु, सत्ता स्थापन होवून बराच कालावधी लोटला असूनही कर्जमुक्तीबाबत सरकारने कोणताही निर्णय घेतला नाही. उलट महायुती घटक पक्षातील नेते शेतकऱ्यांना कर्ज भरणा करण्याचे सुतोवाच करीत आहे. दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकनायक, शेतकरी नेते प्रकाशभाऊ पोहरे यांनी कर्जमुक्ती अर्ज भरण्याचे शेतकऱ्यांना आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत गोंदिया जिल्ह्यातील शेकडो शेतकऱ्यांनी कर्जमुक्ती अर्ज तहसील कार्यालयात धडक दिली. दरम्यान कर्जमुक्तीचे अर्ज भरून तहसीलदार, उपविभागीय अधिकारीमार्फत राज्य शासनाला सादर करण्यात आले.

दरवर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी हतबल झाले आहेत. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतीमालाचे भाव सतत पडले आहे. तसेच कृषी मालवरील जीएसटी आकारणीमुळे उत्पादन खर्चही भरून निघत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. दिवसेंदिवस शेतकरी कर्जबाजारी होत असल्याने आत्महत्या करण्यास परावृत्त होत आहे. शेतमालाला भाव नाही, शेतीला लागणारा खर्च डोईजड जात असून शासन शेतकरी विरोधी धोरणातून गळचेपी करीत शेतर्क?यांना देशोधडीला लावत आहे. निवडणुकीच्या तोंडावर शेतर्क?यांना कर्जमुक्त करून सातबारा कोरा करणार, असे आश्वासन महायुतीच्या घटक पक्षांनी दिले होते. परंतु, सत्ता काबीज करताच आश्वासनपुर्तीकडे सातत्याने टाळले जात आहे. शिवाय कर्ज भरणा करण्याचे सांगून सत्तापक्षातील नेते कर्जमुक्तीला घेवून हातवर करीत आहेत.

आश्वासनाची पूर्तता व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी लोकनायक, शेतकरी नेते प्रकाशभाऊ पोहरे यांनी किसान ब्रिगेडची स्थापना करून



कर्जमुक्ती अर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन केले होते. त्यांच्या आवाहनाला गोंदिया जिल्हाभरातून शेतर्क?यांनी प्रतिसाद देत आहेत. सर्वच तालुक्यात शेकडोच्या संख्येत शेतर्क?यांनी तहसील कार्यालयात धडक देवून कर्जमुक्ती अर्ज तहसीलदार यांना सादर केले. राज्य शासनाने आश्वासनाची पुर्तता करून कर्जमाफी द्यावी, अशी मागी शेतर्क?यांकडून करण्यात आली.

**अर्ज स्विकारण्यास अधिकाऱ्यांचा नकार**

कर्जमुक्तीला घेवून शेतकऱ्यांचा चांगलाच असंतोष दिसून येत आहेत. महायुतीच्या घटक पक्षांनी सत्तेसाठी शेतकऱ्यांची दिशाभूल केली, अशी भावना निर्माण झाली आहे. परिणामी लोकनायक प्रकाशभाऊ पोहरे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीला घेवून एल्गार पुकारला आहे. जिल्ह्यातील आमगाव, गोरेगाव, गोंदिया, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, सालेकसा व तिरोडा या आठही तालुक्यातील शेतर्क?यांनी तहसील कार्यालयावर धडक देवून कर्जमुक्तीचे अर्ज सादर केले. यामुळे यंत्रणेतील अधिकर्ा?यांची एकच कोंडी झाली आहे. अर्जुनी मोरगावसह इतर ठिकाणी संबधित अधिकाऱ्याकडून शेतकऱ्यांचे अर्ज स्विकारण्यास नकार देण्यात आला. या प्रकारामुळे शासन-प्रशासनाचा नाकर्तेपणा चव्हाट्यावर आला आहे.

**आमगावात तहसीलदाराना निवेदन**

विधानसभा निवडणुकीत महायुतीत सहभागी घटक पक्षाने शेतकऱ्यांना निवडणुकीच्या नंतर संपूर्ण कर्जमाफी देणार असे जाहीरनामा काढून आश्वासन दिले होते. परंतु, सत्ता येताच आश्वासनांची पूर्तता केली नाही. तर अद्यापही कर्जमुक्तीला घेवून कोणताच निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे कर्जमाफीच्या आशेवर असलेल्या बळीराजाची घोर निराशा झाली. हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी आधीच संकटात आहे. त्यातही सतत उत्पादनात घट होत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर निर्माण आहे. अशात ज्या शेतकऱ्यांनी कर्जफेड केली नाही, त्यांना खरीप हंगामासाठी पीक कर्ज घेण्यासाठी त्यांची फजगत होणार आहे. शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी कर्जमुक्ती देण्यात यावी, या मागणीला घेवून किसान ब्रिगेड व भारतीय जनकल्याण फाउंडेशनच्या नेतृत्वात शेकडो शेतकरी कर्जमाफीच्या अर्जासह दाखल झाले.

# सैन्याच्या सन्मानार्थ तिरंगा यात्रा, गोंदिया देशभक्तीच्या रंगात डुंबले

**गोंदिया:-** ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय सैन्याच्या धाडस आणि शौर्याला आदरांजली वाहण्यासाठी, भारतीय जनता पक्ष आणि गोंदियाच्या जनतेने आज सोमवार १९ मे रोजी गोंदिया शहरात सैन्याच्या सन्मानार्थ तिरंगा यात्रा काढली.

फुलचूर येथील जलाराम लॉन येथून सुरू झालेली तिरंगा यात्रा शहरातील मुख्य रस्त्यांवरून जात शासकीय विश्रामगृहावर संपली. तिरंगा यात्रेदरम्यान, स्थानिक नागरिकांनी अनेक ठिकाणी फुलांचा वर्षाव करून यात्रेचे स्वागत केले. हातात तिरंगा घेऊन आणि देशभक्तीच्या घोषणा देत लोक यात्रेत सामील झाले.

भारत माता की जय आणि ङ्गवंदे मातरमङ्घ सारख्या घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले आणि वातावरण पूर्णपणे देशभक्तीने भारून गेले. विशेष म्हणजे या प्रवासात मोठ्या संख्येने महिलांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

क्षेत्राचे आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, ङ्गदेशाच्या संरक्षणात तैनात असलेल्या प्रत्येक सैनिकाला हा संदेश



देणे महत्त्वाचे आहे की देशातील प्रत्येक नागरिक त्यांच्यासोबत उभा आहे. आम्हाला आपल्या देशाच्या सैन्याचा अभिमान आहे. या तिरंगा यात्रेच्या माध्यमातून आम्ही सैनिकांच्या त्याग आणि बलिदानाला सलाम करतो.

भाजप जिल्हाध्यक्षा सीताताई रहांगडाले म्हणाल्या, तिरंगा हा केवळ एक ध्वज नाही, तर तो आपल्या ओळखीचे, एकतेचे आणि सार्वभौमत्वाचे प्रतीक आहे. लोकांचा उत्साह दर्शवितो की गोंदिया शहर नेहमीच देशभक्तीत अग्रेसर राहिले आहे. हा प्रवास आपल्या भावनांचे प्रतीक आहे.

तिरंगा यात्रेने संपूर्ण गोंदिया शहर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन टाकले आणि नागरिकांनी एकता आणि अखंडतेचा संदेश दिला.विश्रामगृहात राष्ट्रगीताने यात्रेच्या समारोप झाला. या वेळी माजी सैनिकांचे स्वागत शाल श्रीफल आणि पुष्पहार घालून करण्यात आले. या तिरंगा यात्रेनिमित्त आमदार विनोद अग्रवाल, भाजप जिल्हाध्यक्षा सीताताई रहांगडाले, अशोक इंगळे, मुनेश रहांगडाले, दिनेश दादरीवाल यांच्यासह मोठ्या संख्येने भाजप पदाधिकारी, युवक, महिला आणि गोंदिया शहरातील जनता उपस्थित होती.

# निमगाव लघु प्रकल्प लागणार आता मार्गी



**तिरोडा :** – तालुक्यातील निमगाव लघु सिंचन प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षापासून रखडले आहे. हा प्रकल्प मार्गी लागावा यासाठी सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे संबंधित विभागाने याची दखल घेऊन हा प्रकल्प त्वरित मार्गी लावावा अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आमदार विजय रहांगडाले यांनी दिला होता. त्याचीच दखल घेत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हा प्रकल्प मार्गी लावण्याचे आदेश दिले आहे.

निमगाव पाटबंधारे लघु प्रकल्प तालुक्यातील निमगाव व इंदोरा गावाजवळून वाहणाऱ्या स्थानिक नाल्यावर प्रस्तावित आहे. या प्रकल्पामुळे ३.९१५ दलघमी पाणी साठा तयार होणार आहे, तर १०६२ हेक्टरला सिंचन होणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास बोदलकसा मध्यम प्रकल्पातून निघणाऱ्या उजवा कालव्याद्वारे निमगाव. इंदोराखुर्द, भिवापूर, मेंदीपुर, बेरडीपार, बरबसपुरा, काचेवानी, खैरबोडी, चिरेखनी, गराडा, पालडोंगरी, भुराटोला व चुरडी या १३ गावातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळणार आहे.

या प्रकल्पास दि. ९ जुलै १९७३ मध्ये २३ कोटी ७० लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. प्रथम प्रशासकीय मान्यता दि. ३ डिसेंबर १९८० अन्वये ५१.३१७ लक्ष प्राप्त झालेली असून द्वितीय प्रशासकीय मान्यता प्राप्त दि. १२ मे २००८ अन्वये १८७ लक्ष रुपयास प्राप्त झालेली आहे. प्रकल्पाचे घळभरणी वगळता दोन्ही तीरावरील मातीकाम रोहयोंतर्गत ८० टक्के, सांडवा पूर्ण व आगमन निर्गमन नालीचे काम ४० टक्के पूर्ण झाले आहे.

**वन्यमंत्र्यांनी प्रकल्प मार्गी लावण्याचे आदेश**

वनीकरणाकरिता एकूण २७९ हेक्टर प्रस्तावित जमिनीपैकी २ हेक्टर क्षेत्र अति घनदाट जंगल आहे. २२ हेक्टर दाट जंगल आणि काही भागामध्ये शेतीचे अतिक्रमण व वनीकरण असल्याचे नमूद करण्यात आले आहे. जेव्हापर्यंत पर्यायी वनीकरणाकरीता योग्य जागा उपलब्ध होणार नाही तेव्हापर्यंत प्रकल्पास वनविभागाची अंतिम मान्यता मिळणार नसल्याचे कळिवण्यात आले आहे.

आमदार विजय रहांगडाले यांनी हा विषय तातडीने मार्गी लावण्यात यावा अन्यथा आंदोलनाची भूमिका घेणार असल्याबाबत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांना कळिवले. यावर तातडीने वनमंत्री मंत्रालयात सर्व विभाग प्रमुखांसोबत बैठक आयोजित करून हा विषय तातडीने मार्गी लावण्याबाबतचे आदेश दिले आहेत.

# भीमनगर रेल्वे चौकीमुळे नागरिक झाले त्रस्त

**गोंदिया :-** गोंदिया ते चांदा फोर्ट-बल्लारशाह जाणाऱ्या रेल्वे मार्गावर भीमनगर येथे असलेली रेल्वे चौकी बहुतेक वेळा बंद असते. यामुळे भीमनगर भागातील सुमारे ५० हजार लोक त्रस्त आहेत. ही समस्या सोडवण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली असून, आमदार विनोद अग्रवाल यांना निवेदन दिले आहे.

गोंदिया जंक्शन ते चांदा फोर्ट-बल्लारशाह या रेल्वे मार्गावर भीमनगर येथे मुख्य मार्गावर रेल्वे फाटक आहे. डॉ. आंबेडकर वार्ड, सिग्नलटोली, कुंभारेनगर, सावित्रीबाई फुले नगर, श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, भीमनगर, मुर्री येथील लोकांसाठी हा मुख्य मार्ग असून या रेल्वे फाटकावरूनच रुग्णालय, शाळा-महाविद्यालय, बाजारपेठ आणि इतर भागात ये-जा करतात. मात्र, रेल्वे फाटक बहुतांश वेळा बंद असून, फाटक उघडण्याची वाट बघत नागरिकांना



तासन्तास ताटकळत उभे राहावे लागते. यामुळे लोकांना त्यांच्या दैनंदिन कामात अडचण येत आहे. अशात भीमनगर गेटजवळील सिग्नल केबिनजवळ हलवले तर लाल सिग्नल असूनही, चांदा फोर्टवरून येणाऱ्या गाड्या फाटक ओलांडून पुढे जाऊ शकतील किंवा, मुर्री रेल्वे क्रॉसिंग फाटकाच्या शेजारी सिग्नल पिलर बसवणे सोयीचे होईल आणि फाटक उघडे राहू शकेल अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

यावर आमदार अग्रवाल यांनी ही समस्या सोडवण्यासाठी त्यांच्या पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले. निवेदन देताना, अमित भालेराव, जयंत कुंभलवार, शैलेश टेंभेकर, रविकांत कोटांगळे, रवी भालाधरे, प्रवीण बोरकर व अन्य नागरिक उपस्थित होते.

# घरबसल्या मिळणार रेतीची पावती



**गोंदिया:-** गोंदिया विधानसभा मतदारसंघातील प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना आणि शबरी आवास योजनेअंतर्गत बांधकाम करणाऱ्या हजारो लाभार्थ्यांना आता वाळूच्या कमतरतेचा सामना करावा लागणार नाही. आ. विनोद अग्रवाल यांच्या पुढाकारामुळे आणि प्रयत्नांमुळे हे शक्य झाले असून पात्र लाभार्थ्यांना घरबसल्या ५ ब्रास रेतीचा रॉयल्टी पास दिला जाईल. गुरुवारी (दि.१५) तहसील कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत आ. अग्रवाल यांनी तहसीलदार, बीडीओ आणि सीईओ नगरपरिषदेला सरकारच्या जीआरनुसार गृहनिर्माण योजनांच्या सर्व मंजूर लाभार्थ्यांना रेती रॉयल्टी पास लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावेत, अशी सूचना केली. सुमारे १२ हजार घरकूल लाभार्थ्यांना ५ ब्रास रेतीचे रॉयल्टी पास थेट त्यांच्या घरी पोहोचवले जातील. पास मिळाल्यानंतर, लाभार्थ्याला एका

महिन्याच्या आत स्वतःच्या खर्चाने रेतीचे वाहतूक करावी लागेल. वाळू फक्त नियुक्त केलेल्या रेतीघाटांवरूनच उचलावी लागेल, ज्याची माहिती त्यांना पास देताना दिली जाईल. खाजगी घरे बांधणाऱ्या नागरिकांना प्रतीब्रास ६६० रुपये दराने जास्तीत जास्त ५ ब्रासचा रॉयल्टी पास देखील मिळेल. ज्यासाठी त्यांना त्यांच्या नगर परिषद किंवा ग्रामपंचायतीमध्ये अर्ज करावा लागणार आहे. याशिवाय, सरकारी काम करणाऱ्या कंत्राटदारांनाही प्रति व्यक्ती. दराने रॉयल्टी मिळेल. मंजूर कामाच्या अंदाजपत्रकानुसार प्रति ब्रास ६६० रुपये, जे ते काम सुरू करण्याच्या आदेशाची आणि अंदाजपत्रकाची प्रत तहसीलदारांना सादर करून मिळवू शकतात. लाभार्थी त्यांच्या गावातील तलाठी किंवा ग्रामसेवकांशी संपर्क साधून संपूर्ण माहिती मिळणार आहे. आता ऑनलाईन ऐवजी प्रत्यक्ष पास पूर्वी ही प्रक्रिया ऑनलाईन होती. जी ग्रामीण नागरिकांसाठी गुंतागुंतीची होती.

आ. विनोद अग्रवाल यांनी महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे आणि वित्त आणि नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासमोर हा मुद्दा उपस्थित केला आणि प्रक्रिया ऑफलाइन करण्याची परवानगी मिळवली. त्यामुळे आता तहसीलदारांनी प्रमाणित केलेल्या प्रत्यक्ष स्वरूपात लाभार्थ्यांना रॉयल्टी पास थेट दिले जातील.

# कटंगी येथील सरपंचाविरोधात अविश्वास ठराव पारित

**गोरेगाव :-** गावकऱ्यांनी ज्यांना निवडणुकीत सरपंचपदी निवडून दिले. त्याच गावकऱ्यांनी आपल्या मताचा वापर करत निर्वाचित सरपंचाच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव पारित करून सरपंचाला खुर्चीवरून खाली उतरविले. हा प्रकार गोरेगाव तालुक्यातील कटंगी ग्रामपंचायत गुरुवारी (दि. १५) घडला. कटंगी येथील विद्यमान सरपंचावर अविश्वास प्रस्ताव पारित झाल्याने खळबळ उडाली आहे.

गोरेगाव तालुक्याअंतर्गत कटंगी बु ग्रामपंचायत आहे. सन २०२२ मध्ये पंचायत राज अन्वये मतदानाचा प्रयोग करीत तुलसी मेघनाथ टेंभरे यांना बहुमताने सरपंच पदासाठी निवडून दिले होते. कंटगी ग्रामपंचायतमध्ये एकूण ९ सदस्य आहेत. यातील ९ ग्रामपंचायत सदस्याद्वारे आरोप लावीत सरपंच तुलसी टेंभरे यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव ६ मे च्या मासिक सभेत घेण्यात आला.

निवडणूक अधिकाऱ्यांनी १५ मे रोजी विशेष ग्रामसभा आयोजित केली होती. यात सभेला उपस्थित नागरिकांची मोजणी करण्यात आली. यानंतर मतदान घेण्यात आले. यात विद्यमान सरपंचांच्या बाजूने २१४ तर विरोधात ३८७ जणांनी मतदान केले. त्यामुळे विद्यमान सरपंचाला अखेर पायउतार व्हावे लागले

# लैंगिक छळाच्या आरोपात अभिनेता विजय राज निर्दोष

**गोंदिया:-** बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेता विजय सुखविंदरसिंग राज (५१) हा एका चित्रपटाच्या चित्रिकरणाकरिता २०२० मध्ये आला होता. दरम्यान त्याच्यासोबत असलेल्या महिला को मेंबरने विजय राज याच्यावर लैंगिक छळाचा आरोप करीत रामनगर पोलिसांत तक्रार दाखल केली होती.

पोलिसांनी विजय राजला अटक करून सुटका केली. हे प्रकरण गोंदिया न्यायालयात सुरू होते. दरम्यान न्यायालयाने विजय राज यांची १४ मे रोजी निर्दोष सुटका केली.विद्या बालनच्या शेरनी चित्रपटात अभिनेता विजय राज हे याने काम केले आहे. बालाघाट जिल्ह्यात २०२० मध्ये या चित्रपटाचे चित्रीकरण करण्यात आले. तेव्हा चित्रपटाच्या सेटवर एका सहकाऱ्याने त्याच्यावर लैंगिक छळाचा आरोप केला होता. त्यानंतर त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याला पोलिसांनी अटक केली. मात्र नंतर त्याची जामिनावर सुटका देखील करण्यात आली. तेव्हापासून हे प्रकरण न्यायालयात सुरू होते. विजय राजने महिलेच्या दिसण्याबद्दल टिप्पणी केली होती. यावरून हा वाद सुरू झाला होता. आता चार ते साडे चार वर्षांनी या प्रकरणाचा निकाल लागला आहे सुनावणीदरम्यान गोंदियाचे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी महेंद्र सोते यांनी अभिनेत्याविरुद्ध पुरेशे पुरावे



सादर करण्यात विरोधी पक्ष अपयशी ठरला असल्याने न्यायालयाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ (अ) आणि ३५४ (ड) अंतर्गत सर्व आरोप रद्द केले आहेत.

पिडीत ही शेरनी चित्रपटाच्या चमूतील सहाय्यक व्यवस्थापक व आरोपी हा पूरक अभिनेता म्हणून गेट वे हॉटेल, गोंदिया येथे आले होते. २५ ऑक्टोबर २०२० रोजी रात्री ८.१५ वाजताच्या सुमारास आरोपीचा खाजगी सहाय्यक राम हा पिडीतेला बोलाविण्यास सांगितले होते. परंतु पिडीतेने येण्यास नकार दिला होता. कामासंदर्भात चर्चा करण्यासाठी बोलाविले असता तिने येण्यास नकार दिला होता. २८ ऑक्टोबर रोजी आरोपीने तिला दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाबाबत विचारणा करण्याबाबत बोलविले. २७ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी९ वाजताच्या दरम्यान आरोपीने हॉटेल गेट वे च्या लिफ्ट जवळ तिच्या खांद्यावर हात ठेवण्याचा प्रयत्न केला. २९ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी ८ वाजताच्या दरम्यान जटाशंकर महाविद्यालय, बालाघाट येथे चित्रपटाच्या चित्रीकरणाच्यावेळी ती आरोपीला व्हॅनीटीचा रस्ता दाखवित होती. त्यावेळी आरोपीने तिच्या डाव्या खांद्यावर हात ठेवला. त्यानंतर चित्रपटाचे शेवटचे चित्रीकरण्याच्या वेळी आरोपीचा मेकअप मॅन सतीश व खाजगी सहाय्यक राम हे त्याच्यासोबत असतांना तिच्या तोंडावरील मास्क दोन-तीन वेळा बाजूला केला. चित्रीकरण झाल्यानंतर आरोपीने तिला त्याच्या जवळ बोलविले. तिच्या केसांची प्रसंशा करीत तिच्या मनात लज्जा निर्माण होईल असे कृत्य केल्याचे तक्रारीत म्हटले होते. एकंदरीत या प्रकरणात कव्वा बिर्याणीचा फेम असलेल्या विजय राजला निर्दोष मुक्त करण्यात आले. विजय राज यांचा वकील म्हणून अ‍ॅड. व्ही.एन. बारापात्रे, व अ‍ॅड. सविना बेदी ह्या होत्या.

**पाच साक्षदार तपासले**

या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक पोपट दिवेकर यांनी केला होता. घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले. पाच सा१दार न्यायालयात हजर करण्यात आले होते. अपराधाच्या घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार कुणीच नव्हते. पाच साक्षदारांची साक्ष ही ऐकीव स्वरुपाची आहे. त्यांच्या साक्षीला अभिलेखावर पिडीत किंवा इतर कोणत्याही साक्षीदाराची सुसंगत साक्ष उपलब्ध नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष आरोपीचे अपराधीत्व सिध्द करीत नाही, असे न्यायालयाचे म्हणणे आहे.

# “जेएसडब्ल्यू”ला जुन्या दराने लोहखाण देऊन हजारो कोटी लाटण्याचा डाव

**गडचिरोली** : जिंदल यांच्या ङ्गजेएसडब्ल्यूफ्समुहाने त्यांना मिळालेल्या गडचिरोली जिल्ह्यातील खाणपट्ट्यात निर्धारित वेळेत काम सुरू केले नसल्याने त्यांचा खाणपट्टा रद्द करण्यात आला. मात्र राज्य सरकार त्या खाणपट्ट्याचा खुला लिलाव करण्याऐवजी पुन्हा या समुहाला जुन्याच दराने खाणपट्टा देण्यासाठी धडपड करत आहे. असे झाल्यास सरकारचे महिन्याला पाच हजार कोटींचे नुकसान होईल. या व्यवहारात सत्तेतील तीनही पक्ष आणि त्यांचे नेते सरकारच्या फायद्याऐवजी स्वत: चा फायदा करून घेण्याचा प्रयत्न करत आहेत, असा गंभीर आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी गडचिरोलीत आयोजित पत्रकार परिषदेत केला.

आ.वडेट्टीवार यांनी सांगितले की, जेएसडब्ल्यूला एटापल्ली-भामरागड तालुक्यातील जो खाणपट्टा मंजूर झाला होता त्याचे काम त्यांनी निर्धारित वेळेत सुरू केले नाही. परिणामी नियमानुसार त्यांची खाणपट्ट्याची मंजुरी रद्द करण्यात आली. जेएसडब्ल्यूला त्यावेळी जेमतेम ६६० रुपये प्रतिटन रॉयल्टी या दराने तो खाणपट्टा मिळाला होता. अलिकडे राज्यात झालेल्या लोहखनिजाच्या इतर ७ खाणींच्या लिलावात सरकारला २२०० ते २८०० रुपये प्रतिटन असा भाव मिळाला आहे. मात्र या पद्धतीने वाढीव भावानुसार सरकारला मिळणाऱ्या नफ्याचा विचार न करता सत्ताधारी पक्षांचे लोक जेएसडब्ल्यूला जुन्या दराने (६६० रुपये प्रतिटन) देसाईगंज तालुक्यातील २३०३ हेक्टरचा खाणपट्टा देण्यासाठी धडपडत आहेत. तसे झाल्यास ही कंपनी महिन्याला २५ लाख मे.टन खनिज काढेल आणि त्यातून कंपनीचे महिन्याकाठी ५००० कोटी वाचतील. कंपनीच्या होणाऱ्या त्या फायद्यात सत्ताधारी पक्षांना वाटा हवा आहे, त्यासाठीच त्यांची धडपड सुरू आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी येथे पत्रकार परिषदेत केला. औद्योगिक क्रांतीच्या नावावर गडचिरोली जिल्ह्यात खनिजाची लूट सुरू आहे. त्यातून सत्ताधाऱ्यांचे खिसे प्रचंड प्रमाणात भरले जात आहे, असा आरोप यावेळी आ.वडेट्टीवार यांनी केला.

आमचा उद्योगांना विरोध नाही. पण शेतकऱ्यांची जमीन घेताना त्यांना त्याच दर्जाची पर्यायी जमीन द्या आणि दोन एकरामागे एकाला नोकरी द्या, जमिनीचे दर एक कोटी रुपये हेक्टरी द्या. याशिवाय सुरूवातीला जेवढी गरज आहे तेवढीच जमीन घ्या, पुढे जसजसा कंपनीचा विस्तार होईल तसतशी जमीन घ्या, अशी अपेक्षा आ.विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली.

# निविदा प्रक्रियेत घोळ, जिल्हा क्रीडाधिकारी नंदा खुरपुडे निलंबित

**गोंदिया:-** जिल्हा क्रीडा विभागाच्या वतीने जिल्ह्यात ४६ ओपन जिम तयार करण्याकरिता ३ कोटी १९ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली होती. मात्र या निविदा प्रक्रियेत जिल्हा क्रीडा नंदा खुरपुडे यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने दिलेल्या आदेशाचे पालन न करता ही प्रक्रिया परस्पर राबवून क्रीडा साहित्य खरेदी केले. याप्रकरणी शालेय शिक्षण व क्रीडा उपसचिव सुनील पांढरे यांनी जिल्हा क्रीडाधिकारी नंदा खुरपुडे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

जिल्हा क्रीडा विभागाच्यावतीने तीन महिन्यांपूर्वी जिल्ह्यात ओपन जिमकरिता साहित्य खरेदीसाठी ३ कोटी १९ लाख रुपयांची निविदा प्रक्रिया



राबविण्यात आली आहे.

याअंतर्गत ओपन जिमकरिता लागणारे साहित्य खरेदीसाठी क्रीडा व युतक सेवा संचालनालयाने ठरवून दिलेल्या नियमावलीनुसार प्रक्रिया करून ती खरेदी करण्याची गरज होती. मात्र जिल्हा क्रीडाधिकारी नंदा खुरपुडे यांनी तसे न करता नियमांना डावलून क्रीडा साहित्य खरेदीची निविदा प्रक्रिया राबविली.

तसेच परस्पर क्रीडा साहित्य खरेदीचे आदेश दिल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाल्याचे क्रीडा व युवक सेवा आयुक्त पुणे यांनी सादर केलेल्या अहवालावरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ च्या नियम ४ अन्वये च्या तरतुदीनुसार शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करून या नियमाच्या नियम ४ च्या पोट नियम (१) च्या खंड (अ) नुसार जिल्हा क्रीडाधिकारी नंदा खुरपुडे यांना १३ मे २०२५ पासून पुढील आदेशापर्यंत निलंबित केले आहे.

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली होती तक्रार

**जिल्हा क्रीडा विभागाअंतर्गत व्यायाम शाळा बांधकाम प्रकरणाची पालकमंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत तक्रार करण्यात आली होती. त्यावेळी या व्यायामशाळा बांधकामाची निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याचे आदेश दिले होते. तेव्हा सुद्धा जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. त्यानंतर ओपन जिमच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता केल्याची तक्रार आयुक्तांकडे करण्यात आली होती.**

# नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वाघ घटले,प्राणी गणनेत २३०२ वन्य-प्राण्यांची नोंद

**गोंदिया :-** दरवर्षीप्रमाणे बौद्ध पौर्णिमेच्या दिवशी वन्य प्राणी गणना केली जाते, यंदा १२ मे रोजी नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प परिसरात प्राणी गणना करण्यात आली. त्यात दहा वाघांची, तर २४ बिबट्यांची नोंद झाली आहे. गेल्या वर्षी तुलनेत यंदा दोन वाघांची संख्या कमी झाली, तर सहा बिबट्यांची संख्या वाढली असल्याचे प्राणी गणनेच्या आकडेवारीवरून पुढे आले आहे. बौद्ध पौर्णिमेला चंद्राच्या उजेडात प्राणी गणना केली जाते. दि. १२ मे रोजी सायंकाळी ६ ते सकाळी ६ वाजेपर्यत नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पात प्राणी गणना करण्यात आली. प्राणी गणना करण्यासाठी ७५ मचाणावर सज्ज असलेल्या १५६ वन्यप्रेमी व वन्यजीव विभागाच्या अधिकाऱ्यांना सर्व श्रेणीच्या वन्यप्राण्यांचे दर्शन झाले. नागझिरा व्याघ्र प्रकल्पात १० वाघांसह एकूण २३०२ प्राण्यांची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे नागझिरा व्याघ्र प्रकल्प वन्यप्रेमींसाठी आगामी काळात आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. प्राणी गणनेदरम्यान नवेगाव, राष्ट्रीय उद्यान, पिटेझरी, कोका, मंगेझरी या क्षेत्रांत गणना पथक कार्यरत करण्यात आले. या गणना प्रक्रियेत वाघ, बिबट, रानकुत्रा, हरीण, अस्वल, रानडुक्कर, मुंगूस,



रानगवे, नीलगाय, सांबर, चितळ, वानर, मोर, साळींदर, रानमांजर, उदमांजर, भेटकी, तडस, हळद्या, कोकिळा, सनबर्ड, घार, चौसिंगा, पॅगोलियन, ससा, लाल तोंड्या माकड, गरुड, रानमांजर, पाहायला मिळाले. एकंदरीत नागझिरा व्याघ्र प्रकल्प बफर झोन परिसरात सर्व वर्गीय २३०२ प्राण्यांची नोंद करण्यात आली. तर गेल्यावर्षी १९८५ वन्यप्राण्यांची नोंद झाली. गेल्यावर्षीच्या तुलनेत वन्यप्राण्यांच्या संख्येत वाढ झाल्याने वन्यप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचा बफर झोन परिसर मोठ्या प्रमाणात व्याप्त आहे. या परिसरात पिटेझरी, नागझिरा, उमरझरी, डोंगरगाव, बोंडे, राष्ट्रीय उद्यान नवेगावबांध व कोका या क्षेत्रांचा बफर झोनमध्ये समावेश आहे.नागझिरा बफर झोन परिसरात गणनेसाठी असलेल्या यंत्रणेची चांगलीच पर्वणी झाली. या क्षेत्रात एकूण २३०२ वन्यप्राण्यांच्या नोंदींपैकी तब्बल ६७५ प्राणी याच क्षेत्रात नोंदविण्यात आले आहेत.

१२ मे ते १३ मे २०२५



दरम्यान सेवा संस्था गोंदिया, वनविभाग गोंदिया, नवेगाव-नागझीरा व्याघ्र प्रकल्प आणि ऋऊच गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. दिनांक १२ मे २०२५ रोजी जांभळी वनपरिक्षेत्र कार्यालयात सेवा संस्थेचे सर्व स्वयंसेवक व वनकर्मचारी एकत्रित आले. त्यानंतर मचाण आरक्षण (अश्रश्रींाशपीं) करण्यात आले. प्रत्येक मचाणावर १ ते २ स्वयंसेवक व १ ते २ वनकर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली. संपूर्ण कॉरिडोर/बफर क्षेत्रामध्ये एफ.डी.सी.एम. मधील जांभळी १ व जांभळी २ वनपरिक्षेत्रात व प्रादेशिक वनपरिक्षेत्रातील सडक अर्जुनी, गोरेगाव, गोंदिया मध्ये जवळ पास २३ मचाणावर सेवा संस्थेचे स्वयंसेवी व वनकर्मचारी यांनी निसर्गानुभव घेत प्रगणनेत भाग घेतला. प्रगणनेत नोंद करण्यात आलेल्या प्राण्यांची सूचीः. वाघ, बिबट, अस्वल, नीलगाय, चितळ, सांभर, रानगवा, रानटी डुक्कर, चौसिंगा इत्यादी वन्यप्राण्यांची नोंद करण्यात आली.

मचाण निसर्गनुभव निरीक्षण/ प्राणी प्रगणना प्रमोद पंचभाई, उपवनसंरक्षक गोंदिया ,ए.डी.नागे, विभागीय व्यवस्थापक वनप्रकल्प विभाग भंडारा,सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आली. तसेच दिलीप कौशिक, वनपरिक्षेत्र अधिकारी गोंदिया, मंगेश बागडे वनपरिक्षेत्र अधिकारी जांभळी १, श्री डोंगरावर वनपरिक्षेत्र अधिकारी जांभळी २,एम.के.गडवे, वनपरिक्षेत्र अधिकारी गोरेगाव,मिथुन तरोने, वनपरिक्षेत्र अधिकारी सडक अर्जुनी, सेवा संस्थेचे कन्हैया उदापूरे, सुशील

**प्राणी गणना २०२५**
**प्राणी गणना २०२४**

| | |
|---|---|
| वाघ | १०-१२ |
| बिबट | २४-१८ |
| रानकुत्रे | ६३-८२ |
| सांबर | ४२ |
| चितळ | १६८-११५ |
| रानगवा | ८८६-७२० |
| अस्वल | ९७-७५ |
| नीलगाय | ८८-७१ |
| रानडुक्कर | २५५-१२८ |
| चौसिंगा | १३-०३ |
| मोर | १२०-१३६ |

बहेकार, गौरव मटाले, डीलेश कुसराम, लोकेश भोयर, प्रवीण मेंढे, पवन सोयाम, नदीम खान, प्रतिक लाडेकर, निशांत कुर्वे, अमेय निनावे, हसीन चिखलोंडे, मनीष ढोमणे, सागर कंसारे, संजू डूभरे, अरुण तिवारी, फरहान सिद्दिकी, सानिध्य गजभिये, प्रणय ठाकरे, रिषभ मारवाडे, आकाश यादव असे जवळपास ४० ते ५० सेवा संस्थेचे सदस्य मिळून हे निसर्गनुभव उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले. या उपक्रमामध्ये सेवा संस्थेचे स्वयंसेवक व वनविभागाचे कर्मचारी यांनी संयुक्तरीत्या सहभागी होऊन वन्यजीव प्रगणना (सर्वेक्षण) यामध्ये सहभाग घेतला. वनविभागाचे व सेवा संस्थेच्या स्वयंसेवीचे सहकार्य अत्यंत मोलाचे ठरले.

# देवरी उपविभागीय पोलिस अधिकारी व गोंदिया शहर ठाणे अव्वल : शंभर दिवस कृती कार्यक्रम

**गोंदिया :-** जानेवारी २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाने शंभर दिवस कृती कार्यक्रम राबविण्यात आला. यात देवरी उपविभागीय कार्यालय व गोंदिया शहर पोलिस स्टेशनने तालुकास्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. यांनी राबविलेला सात कलमी कार्यक्रम प्रभावी ठरला आहे. शासनाने १०० दिवसांचा सात कलमी सुधारणा कार्यक्रम आखून दिला होता. यात नागपूर विभाग स्तरावर दुसऱ्या टप्प्यात तालुका क्षेत्रीय स्तरावर सुधारणा मूल्यमापन कार्यक्रमात देवरी उपविभागीय पोलिस अधिकारी प्रथम तर तिरोडा उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय तृतीय आणि पोलिस स्टेशन स्तरावर पोलिस ठाणे गोंदिया शहर प्रथम तर पोलिस ठाणे तिरोडा तृतीय ठरला. या मोहिमेंतर्गत क्षेत्रीय कार्यालयासाठी गोंदिया शहर पोलीस ठाणे संकेतस्थळ, कार्यालयीन सुधारणा, नागरिकांसाठी पुरवण्यात येणाऱ्या सेवांचे सुलभीकरण, जुन्या अभिलेखांचे निंदनीकरण व निर्लेखन, कालबाह्य वस्तू व वाहनांची विल्हेवाट, कार्यालयाने राबविलेल्या नावीन्यपूर्ण योजना आदी विषयांवर कामकाज करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी ठरवून दिलेली शंभर दिवसांची मुदत १६ एप्रिल रोजी संपल्यानंतर, दुसऱ्या टप्प्यात विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेली महाराष्ट्रातील तालुका स्तरावरील क्षेत्रीय शासकीय कार्यालये ज्यात नागपूर विभाग स्तरावरील जिल्हा पोलिस दलातील तालुका स्तरावरील कार्यालयाने केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन प्रथम पोलिस अधीक्षक कार्यालय, नंतर नागपूर परिक्षेत्र, कार्यालय आणि पोलिस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात आले. त्यात ३ कार्यालयांची निवड करण्यात आली होती.



## कुशल नेतृत्वाचे फळ

**पोलिस अधीक्षक गोरख भामरे यांच्या कुशल नेतृत्व, मार्गदर्शनाखाली अप्पर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा यांच्या मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय देवरी, तिरोडा, पोलिस ठाणे गोंदिया शहर आणि पोलिस ठाणे तिरोडा येथील पोलिस अधिकारी, अंमलदार यांनी अहोरात्र घेतलेल्या मेहनतीने हे यश मिळाले आहे. उत्कृष्ट कामगिरीबद्दल उपविभागीय पोलिस अधिकारी विवेक पाटील, साहिल झरकर, पोलिस निरीक्षक किशोर पर्वते, अमित वानखेडे तसेच सहायक पोलिस निरीक्षक ओम गेडाम, नागरगोजे, पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत हत्तीमारे यांचे कौतुक केले आहे.**